# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



श्रीबाबांनी जात्यात महामारीला अक्षरशः दळले आणि शिरडीकरांना महामारी पासून वाचविले. काय हा बाबांचा चमत्कार!

श्री साईनाथ वाचनालय
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.

ऑगस्ट १९८३] [किंमत एक रुपया

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

**श्रीसाई वाक्सुधा**

वर्ष ६२ वे )      किंमत १ रुपया      ( अंक ५

ऑगस्ट १९८३

दूरध्वनी
८८२२५६१

: कार्यालय :
" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

महादुस्तर हा भवार्णव ।
करा साई चरणांची नाव ।
दाविल निर्भय पैलठाव ।
पहा नवलाव निष्ठेचा ॥३७॥

पाळितां या ऐशा व्रता ।
भासे न संसार दुःख तीव्रता ।
लाभ न अन्य येणे परता ।
सेवा समर्थता ती हीच ॥३८॥

साई चरणीं अत्यंत भक्ति ।
नयनीं कोंदो साईमूर्ती ।
साईच दिसे सर्वांभूतीं ।
ऐसी ही स्थिती भक्तां येवो ॥३९॥

होऊनियां स्वच्छंद वर्ती ।
पूर्वजन्मीं पावलों च्युती
आतां तरी लाभो सद्गती ।
भंग निर्मुक्ति ये अर्थी ॥४०॥

पाठीसी असतां श्रीसमर्थ ।
कोणीही लावूं न शके हात ।
ऐसिया निर्धारें जे निर्धास्त ।
धन्य ते भक्त साईचे ॥४१॥

—श्री साईसत्‌चरित अध्याय ५२ वा

# सुवचन

सर्वनाशे समुत्पन्ने, ह्यर्धंत्यजति पण्डितः ।

अर्धेन कुरुते कार्यं सर्वनाशो हि दुःसहः ॥

सर्वनाश ओढवला असता शहाणा माणूस अर्धे सोडून देतो व अर्ध्याने आपले काम तडीस नेतो. कारण की सर्वनाश सहन करणे कठीण असते.


# अनुक्रमणिका ऑगस्ट १९८३


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | – इच्छेप्रमाणे घडू दे |
| २) | बाबांजवळ काय मागावे | – श्री. मु. ब. निंबाळकर |
| ३) | रक्षाबंधन | – श्री. ग. रा. पालकर |
| ४) | साईचरणी निष्ठा ठेवा | – सौ. मालती गाळवणकर |
| ५) | भाव तिथे देव | – श्री. बाळकृष्ण देसाई |
| ६) | श्रीबाबांची कृपा | – सौ. मीनाक्षी राजुरकर |
| ७) | जगा लावावे सत्पथी | – कु. हेमलता केसकर |
| ८) | शिरडी, साईबाबा व शिकवण | – श्री. रमेश चव्हाण |
| ९) | श्रीसाईकृपा | – सौ. उज्वला झारापकर |
| १०) | बाबांची अजब कृत्ये | – श्री. माधव गोरे |
| ११) | साईची लीला अगाध आहे | – श्री. आनंदा चाफेकर. |
| १२) | श्री बाबांची अगाध लीला | – सौ. उषाताई अधिकारी |
| १३) | माझी समर्थ साई माऊली | – सौ. लीलावती बर्वे |
| १४) | लागली साईभक्तीची ओढ | – श्री. रामचंद्र झिलपे |
| १५) | बाबा आणि मी | – सौ. नील. उपाध्ये |
| १६) | कृतांताच्या दाढेतून | – श्री. प्रविण वैवुडे |
| १७) | नित्य मी जिवंत | – श्री. के. के. थिटे |
| १८) | आगळा वेगळा माझा साई | – श्री. सुरेश कुलकर्णी |
| १९) | साईबाबा आणि आपण | – कुमार बिपिन चव्हाण |
| २०) | श्री. नानासाहेब चांदोरकर | – श्री. सदानंद चेंदवणकर |
| २१) | कृ. जा. भिष्म | – श्री. मोहन लोंबर |
| २२) | पळवाट | – श्री. किसन कुलकर्णी |
| २३) | श्री साई सुमनमाला | – सौ. शांता सरोदे |
| २४) | मशिदीत प्रगटले | – श्री. स. ना. नवरे |
| २५) | बाबा | – श्रीमती श्री शहाणे |
| २६) | साई वारस तो कोणाचा | – श्री. विनायक पाठक |
| २७) | साईलीला | – सौ. आशालता भालेराव |
| २८) | देई दर्शन साईदेवा | – राधाकृष्ण गुप्ता |
| २९) | श्रीसाईपादुकाष्टक | – श्री रमाकांत पंडित |
| ३०) | जन्मोजन्मी झीजावी तव द्वारी | – श्री. श्रीधर प्रभुणे |
| ३१) | अस्थिव्यंग शिबिर | – —— |
| ३२) | शिरडी वृत्त | – जून १९८३ |

# इच्छेप्रमाणे घडू दे

स. न. वि. वि.

जे जे काही घडे सदैव तुझिया इच्छाबळे ते घडे ।
ऐसे जाणुनि सोसण्यासि मज ते सद्धैर्य दे तेवढे ।




'आपले मन प्रसन्न व आनंदी रहावे असे कोणाला वाटत नाही?' परंतु ते घडावे कसे? प्रसन्नता व आनंद प्राप्त करून घेण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे जे आपल्या आटोक्यातील नाही त्याची चिंता करण्याचे व त्याबद्दल सुखदुःख मानण्याचे आपण सोडून दिले पाहिजे.' हे एका यूरोपीय तत्वज्ञान्याचे विचार आहेत.

परंतु आपण कोणत्या ना कोणत्या तरी चिंतेत सदासर्वकाळ गुरफटलेले असतो. उगाच चिंतेचा नसता व्याप आपण आपल्या मागे लावून घेत असतो.

भगवंताची मर्जी जशी असेल तसे होईल. त्याच्यावर सारा भरिभार टाकून आपण निश्चित रहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. 'ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असो द्यावे समाधान.' ही संतवाणी आपण आपल्या हृत्पटलावर कोरून ठेविली पाहिजे.

जी भगवंताची इच्छा तीच आपण आपली इच्छा समजून तिच्यापुढे नेहमी वाकले पाहिजे. तो जे इच्छिल तेच घडेल, असे बाबांनी सांगितले आहे. तुमचे भवितव्य त्याच्या हाती आहे. तुमच्या हाती काही नाही. मग शोक किंवा दुःख का म्हणून करायचे? तसेच तो जे काही करतो ते तुमच्या भल्यासाठी अशी श्रद्धा तुमच्या ठायी दृढ का होऊ नये?

'ठेविले अनंते तैसेचि रहावे' हे म्हणणे फार सोपे आहे; परंतु तितकेच ते आचरणात आणणे कठिण आहे. ज्यांनी हा महामंत्र आचरणात आणण्यात यश मिळविले ते खरोखर धन्य होत.

आमचे एक मित्र आहेत. बरी वाईट कोणतीहि गोष्ट असो, 'देव करतो ते आपल्या बऱ्यासाठी' हे पालुपद नेहमी त्यांच्या तोंडी असते. त्याप्रमाणे थोडेफार

आचरणहि त्यांच्याकडून घडत असते. त्या मंत्राची घट्ट कास धरल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर दुःखाची छटा सहसा आढळून येत नाहीं. सुखाचा मूळ मंत्र त्यांना सापडला आहे.

आम्हांला वाटत असते की, प्रत्येक गोष्ट आमच्या मर्जीप्रमाणे घडून आली पाहिजे. आपण योजल्याप्रमाणे नाही घडून आले की मर्जी खप्पा झाली! मन दुःखी, कष्टी झालेच म्हणून समजावे. मनाप्रमाणे घडून आले म्हणजे आनंद व मनाविरुद्ध काही घडले म्हणजे दुःख! असा हा सुखदुःखाचा खेळ अविरत चाललेला असतो.

मनाविरुद्ध काही प्रकार घडला म्हणजे केवढे आकांडतांडव, केवढी आदळ आपट आणि मग देवाच्या नावाने आपण खडे फोडू लागतो! त्याऐवजी

"जे जे काही घडे सदैव तुझिया इच्छाबळे ते घडे ।
ऐसे जाणुनि सोसण्यासि मज ते सद्धैर्य दे तेवढे॥"

अशी समजूत करून आपण देवाला वरीलप्रमाणे का बरे आळवित नाही? त्यामुळे काय होईल? दुःखाचे व चिंतेचे मूळच उपटून टाकण्यास आपण समर्थ होऊ.

कोणतीहि परिस्थिति वाट्यास येवो. येईल त्या परिस्थितीत जो आनंद राहील व 'तुझी इच्छा!' असे म्हणून जो उत्साहपूर्वक कार्यास लागेल तोच खरा वीर पुरुष होय. या जगात त्याच्याकडून पराक्रमाच्या गोष्टी घडून येण्याची शक्यता आहे.

सुखाच्या घरात रहायला मिळो वा वनवास घडो. बरोबर कोणी सहकारी असो वा नसो; थंडीच्यावेळी फाटकी घोंगडी ओढायला मिळो किंवा मौल्यवान शाल वाट्यास येवो, ज्याच्या समाधानाला जरासुद्धा गालबोट लागत नाहीं, त्याने आपले जीवन सफल केले असे म्हणायला हरकत नाहीं.

झोपायला जमीन मिळो, खाट मिळो, वा पलंग मिळो; खायला वेळेवर जे मिळेल त्यात आनंद. जे मिळेल, जेवढे मिळेल व जेथे मिळेल तेथे त्याचा आनंदाने स्वीकार करून पुढील वाटचाल करावयाची. प्रत्येक गोष्टीत कुत्सित-पणाने घाण शोधीत न बसता चांगले दिसेल तेच पहावयाचे व तेच निवडावयाचे कोणतेही कार्य करीत असता ते मनापासून करावयाचे. मग त्यात यश मिळो वा अपयश मिळो; त्याची खंत बाळगायची नाहीं. तेवढ्यासाठी प्रसन्नता गमावून बसायचे नाहीं.

एक होता राजा; त्याच्या पदरी एक साधुवृत्तीचा मंत्री होता. कोणत्याही परिस्थितीत आनंदी व समाधानी रहावयाचे हा योग त्याने साधलेला होता. तो खरोखर भाग्यवान् होता. 'देव जे जे काही करतो ते आमच्या भल्यासाठी' हे त्याचे नेहमीचे पालुपद होते. बरे, वाईट काहीं घडो; देव करतो ते भल्यासाठी, हा त्याचा तोडगा प्रत्येक प्रसंगी ठरलेला!

एके दिवशी जे घडू नये ते घडले. राजाच्या आंगठ्याचा काहीं भाग अपघातामुळे कापला गेला! केवढी ही दुर्घटना!

मंत्री विश्वासातला. राजाने तो कापलेला अंगठा त्या मंत्र्याला दाखविला. त्याने राजाच्या समाधानाकरता निदान 'अरेरे! फार वाईट झाले! औषधोपचार करू या.' अशासारखे समाधानाचे काहींतरी दोन शब्द बोलायचे की नाहींत? मग मंत्री काय म्हणाला? तो आपल्या नेहमीच्या भावेत म्हणाला, 'देव जे जे काही करतो ते आमच्या भल्यासाठीच!'

ते ऐकून राजा क्रोधायमान झाला! आणि कोणाला नाही येणार राग! राजाचा राग बरोबर होता.

आधीच बोट कापल्यामुळे राजाला वेदना होत होत्या. त्यात मंत्र्याच्या वाक्याने त्याच्या देहाचा अधिकच भडका उडाला! 'काय म्हणे, देव करतो ते सारे आमच्या भल्यासाठी! यात कसला आलाय भलेपणा! माझे सर्वांग त्यामुळे ठणकते आहे. माझा हात निकामी झालाय, आणि त्यात आहे म्हणे भलेपणा!'

रागाच्या भरात राजाने हुकम सोडला की तोंडास येईल ते बडबडणाऱ्या या मंत्र्यास कारागृहात डांबून ठेवा!

राजाज्ञा! ती तावडतोब अंमलात आली. मंत्री महाशय तुरुंगात जाऊन बसले! त्यातही त्यांनी समाधान मानले. जाता जाता 'देव करतो ते आपल्या भल्यासाठी' असे पुटपुटत त्याने तुरुंगात प्रवेश केला.

राजाला शिकारीचा नाद होता. अंगठ्याची जखम बरी झाली नव्हती. तशाच स्थितीत एके दिवशी राजा जंगलात शिकारीसाठी गेला. बरोबरचे लोक मागे राहिले होते. राजा बंदुकीसह पुढे पुढे जात होता. इतक्यात तो रस्ता चुकला व फिरता फिरता थकून गेला. इतका थकला की, त्याच्याने घोड्यावर बसला असताही पुढे जाववेना. घोड्याला एका झाडाच्या बुंध्याला बांधून राजा झाडाच्या सावलीत स्वस्थ पडून राहिला. इतक्यात भुकेलेला एक सिंह वास

काढील तेथे आला. अगदी नजिक आला. राजा जागच्या जागी गारठून गेला. सिंह त्याच्यावर झडप घालणार तोच तुटलेल्या आंगठ्याकडे त्याचे लक्ष गेले! नाराज होऊन पुढे टाकलेला पंजा त्याने तात्काळ मागे घेतला. जखमी झालेल्या प्राण्याच्या वाटेचास सिंह सहसा जात नाहीं. राजा बचावला! सिंहाने घोड्यावर झडप घालून आपली क्षुधा शांत केली. तो तेथून चालता झाला.

राजाच्या प्राणावर गदा आली होती, परंतु सुदैवाने तो बचावला. कापलेल्या आंगठ्याने त्याला वाचविले. राजा राजधानीत आला. राजवाड्यात दाखल होताच त्याने एका नोकरास पाठवून कारागृहावासात असलेल्या मंत्र्यास प्रथम बोलावून घेतले. मंत्री महाशय येताच त्याला उद्देशून राजा म्हणाला, 'मला मान्य आहे तुमचे म्हणणे. देवाने मला चांगला धडा शिकविला. खरं आहे तुमचं म्हणणं! देव जे काही करतो ते आमच्या भल्यासाठी! माझा हा आंगठा कापला गेला नसता तर आज माझ्या प्राणावरच बेतली असती! सिंहाने फाडफाडून माझे तुकडे करून टाकले असते! परंतु दुसऱ्या एका गोष्टीचा मला अजून खुलासा झाला नाहीं. सांगा पाहू, तुम्हांला तुरुंगात डांबून ठेऊन देवाने तुमचे काय भले केले?'

'महाराज! काय सांगू? देव परम दयाळू आहे. त्याला प्रत्येकाची काळजी आहे. त्याला तुमची काळजी तशीच माझीही काळजी! मी तुरुंगात जाऊन पडलो नसतो तर आपण शिकारीस जाताना मला बरोबर नेल्याशिवाय राहिला नसता आणि मला तर कुठेहि जखम झालेली नव्हती; त्यामुळे तुम्हांला सोडून सिंहाने माझाच फन्ना उडविला असता नाही का? तेव्हां मी तुरुंगात जाणे हे माझ्या कल्याणाचे होते. देवाचे हेतु अगम्य असतात. त्यातील रहस्य कधी कधी तुम्हां आम्हांला समजत नाही; परंतु आपण नेहमी श्रद्धा ठेवली पाहिजे की, तो जे जे काही करतो, ते आमच्या कल्याणासाठी करतो. तेव्हां भगवंताची इच्छा होती तसे घडले, असे समजून आपण तिच्यापुढे समाधानपूर्वक मान वाकविली पाहिजे आणि म्हटले पाहिजे की, 'भगवान, तुझी इच्छा होती तसे घडले. मी राजी आहे. नेहमी तुझ्याच इच्छेप्रमाणे घडो.'

जेव्हा श्रीसाईभक्तांनो तुमच्या बाबतीत जे जे घडते ते ते सर्व श्रीसाईंच्या इच्छेनेच असे म्हणावयास हरकत नाही. श्रीसाई कुणाचेही वाईट करणार नाहीत यावर श्रध्दा ठेवा. ☆

# बाबांजवळ काय मागावे आणि कसे मागावे ?

—ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
१।१४ फाईव्ह स्टार अपार्टमेंट्स
बंड गार्डन रोड, पुणे ४११००१

* (या लेखातील मते माझी स्वतःची असून मला बऱ्याच विचाराअंती अनुभवावरुन पटलेली आहेत. काहीं वाचकांना ती पटतील व मार्गदर्शक होतील असे वाटल्यावरुन मी ती देत आहे. यात कोणाही साईभक्ताचा अनादर किंवा टीका करण्याचा माझा हेतू नाहीं. कारण बाबांची भक्ती प्रत्येकजण आपापल्या शक्ती, ज्ञान व आवडीप्रमाणे करीत असतो. तेव्हां या लेखातील विचारांमुळे कोणा साईभक्तांना मी टीका केल्यासारखें वाटून त्यांची मनें दुखावली गेली असल्यास मी क्षमा मागतो — लेखक)

खरे म्हणजे बाबांजवळ काहींच मागू नये! भक्त म्हाळसापतीनी इतकी गरीबी होती तरी कधी बाबांकडे हात पसरला होता का? काकासाहेब दीक्षितांचा लंगडेपणा किती वर्षांचा होता परंतु तो बरा करण्यास त्यांनी बाबांना विनंती केली होती कां? काका महाजनींना मोडसी झाली होती परंतु मशिदीत नियमित हजर रहाता यावे म्हणून पाण्याने भरलेला तांब्या बाजूला आणून ठेवला होता. पण आपल्या व्याधिबद्दल बाबांना ते चकार शब्द बोलले नव्हते. डहाणूचे मामलतदार देव यांना ज्ञानेश्वरीचा पाठ साधेना. सारख्या अडचणी येत होत्या. काहीं भक्तांनी त्यांना ज्ञानेश्वरीची पोथी बाबांजवळ देऊन आशीर्वादासह परत मिळविण्याची युक्ति सांगितली होती. परंतु बाबा सर्व काही जाणताहेत तेव्हां ते आपण होऊनच मला तशी आज्ञा देतील असा त्यांनी विश्वास प्रकट केला होता. नांदेडच्या अब्दुलभाईनी आपल्या सेवेच्या बदल्यात कसली याचना केली होती कां?

वरील सर्व श्रेष्ठ भक्तांचा बाबा साक्षात् ईश्वर असून सर्वसमर्थ व त्रिकालज्ञानी आहेत असा दृढ विश्वास होता तेव्हां त्यांचेवळ संसारातील अशाश्वत गोष्टीसाठी का हात पसरावयाचा? मागणे झालेच तर शाश्वत सुख, जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका किंवा मोक्षच कां मागू नये?

श्रीमद्भगवद्गीतेत ७ व्या अध्यायात भगवान् श्रीकृष्णांनी अर्जुनाला म्हटले आहे, "हे भरतश्रेष्ठा, आर्त (दुःखग्रस्त), जिज्ञासु (ज्ञान मिळवू इच्छिणारा, अर्थार्थी (धनेच्छु) आणि ज्ञानी (तत्त्वज्ञ) असे चार प्रकारचे पुण्यवान लोक मला भजतात. त्यापैकी एकनिष्ठेने माझी भक्ती करणारा, नेहमी युक्त

(मन्निष्ठ) असणारा असा ज्ञानी भक्तच श्रेष्ठ होय. मी ज्ञान्याला अत्यंत प्रिय व ज्ञानीही मला तसाच प्रिय आहे."

परंतु आपल्यासारख्या साधारण व प्रापंचिक सुखदुःखात गढलेल्या व्यक्तींना ही उच्चतम भक्ती (लाभेवीण प्रिती) शक्य नसते व तितकी दुःखे सोसण्याची मनाची तयारीही नसते. तेव्हां संसारात अडचणी आल्या व दुःखद प्रसंगाने वैताग आला की बाबांकडे त्याचे निवारण करण्यासाठी याचना करण्याची साहजिकच प्रवृत्ति होते. यात काहीच गैर नाही. संकटसमयी बालकाने आपल्या आईकडे धाव घ्यायची नाहीतर कोणाकडे? शामाला सर्पदंश झाला तेव्हां ते बाबांकडेच धावत गेले ना? कै. नानासाहेब चांदोरकर यांची मुलगी प्रसूतिच्या वेळी अडली होती त्यावेळी त्यांनी बाबांनाच जामनेरहून गाऱ्हाणे लावले होते ना? भिमाजी पाटील क्षय रोगाने कातावून गेले होते, अमीर शक्कर संधिवाताने जर्जर झाला होता आणि डॉ. पिल्ले नारूच्या व्यथेने रडकुंडीस आले होते तेव्हां हे सर्वजण बाबांकडेच शिरडीस धावले होते ना?

परंतु आपले संकट निवारण्यासाठी किंवा इच्छित वस्तु प्राप्त करून घेण्यासाठी बाबांना नवस करणे उदा. शिरडीस जाऊन बाबांच्या समाधीला भरजरी चादर चढविणे किंवा अभिषेक करून अमुक रक्कम पेटीत टाकणे, आपला अनुभव श्रीसाईलीलेत प्रसिद्ध करण्यास देणे वगैरे. या गोष्टीमुळे साईभक्तीला एक प्रकारचे व्यावहारिक स्वरूप येते असे मला स्वतःला वाटते. बाबांनी माझ्या मनासारखे केले तरच मी असे करीन, याचा अर्थ काय? बाबा नेहमीच मदत करतात यात शंका नाही. 'जो जे मागे त्याते तो देई । हे ब्रीद जयाने बांधिले पायी।।' असे हेमाडपंत म्हणतात. परंतु समजा तसे नाही केले तर काय तुम्ही नवस पुरा करणार नाही? म्हणजे ही व्यापारी देवाण घेवाण झाली नाही का?

श्रीसाईसच्चरितामध्ये बाबांना आपल्या इच्छापूर्तीसाठी नवस केल्याची फक्त तीन उदाहरणे आहेत पण ती फार बोलकी आहेत. अध्याय १५ मध्ये चोळकरांनी खात्याची परीक्षा पास झाल्यावर शिरडीस जाऊन बाबांना खडीसाखर अर्पण करावयाचा नवस केला होता. तसेच अध्याय ३६ मध्ये गोमांतकाहून आलेल्या दोन गृहस्थांपैकी एकाने लवकर नोकरी लागल्यास पहिला पगार (रु. १५) बाबांना (दत्तांना) अर्पण करण्याचा नवस केला होता व दुसऱ्याने आपले तीस हजार रुपये चोरीस गेलेले परत मिळाल्यावर बाबांचे दर्शन घेईपर्यंत खाण्यात आवडत्या पदार्थाचा त्याग केला होता.

पहिल्या उदाहरणांत चोळकरांनी नवस केला व त्याप्रमाणे फळही मिळाले. परंतु आर्थिक व इतर अडचणीमुळे त्यांना शिरडीस जाता आले नाही म्हणून खऱ्या भक्ताप्रमाणे साखर खायचेच काय पण साखरेचा चहा देखील घ्यावयाचे

सोडून दिले. असली भक्ती पाहून बाबा खरोखरीच खूष झाले आणि चोळकर भेटल्यावर व नवस फेडल्याबरोबरच जोगांना त्यांना साखरेच्या चहाचे भरपूर प्याले पाजावयास सांगून हर्षित करून सोडले. दुसऱ्या उदाहरणातील गोमांतकातील पहिल्या गृहस्थास नवस केल्याप्रमाणे रु. १५ वर लगेच नोकरी मिळाली होती. परंतु पंधराचे तीस झाले. तीसाचे साठ व अखेर रु. ७०० झाले तरी नवस फेडण्याची सय राहिली नाही. ही तर नेहमीचीच गोष्ट आहे. श्रीसत्यनारायणाच्या कथेतील साधु वाण्याचे उदाहरण सर्वांच्या परिचयाचेच आहे. शेवटी बाबांसारख्या संतांना नवस बुडविणाऱ्या व्यक्ती कडून काहीतरी निमित्ताने (उदा. दक्षिणारूपाने मागून) फेडून घेऊन त्याला ऋणमुक्त करावे लागते. या विषयी बाबांचे स्वतःचेच शब्द ऐका

**'जो जे मागे त्याते तो देई । हे ब्रीद जयाने बांधिले पायी ।।'**
**'देवी नवसती गरजेपुरत्या । मज उद्धरित्या सायास ।।२५।।**
**तुम्हास नाही त्याची काळजी । वेळेपुरती करितां अजीजी ।**
**अनृणी जो भक्तांमाजी । तया मी राजी सदैव ।। अ. ३६ ओ. २६।।'**

तिसऱ्या उदाहरणातील दुसऱ्या गृहस्थाचा बाबांशी काय ऋणानुबंध होता कोण जाणे! त्याचे तीस हजार रुपये चोरीस गेले तेव्हां बाबांनी स्वतःत फकीररूपाने त्याचेकडे जाऊन त्याला शिरडीच्या साईबाबांना नवस करण्याचा सल्ला दिला. परंतु त्याचे पैसे परत मिळाल्यावर हाही गृहस्थ ते मिळाल्याच्या हर्षात व मोहात आपला नवस विसरला. शेवटी बाबांनी कुलाबा येथे स्वप्नात जाऊन त्याला नवस फेडण्याची आठवण करून दिली. इतकेच नव्हे तर शिरडीस जाताना बोटीत जागा मिळत नव्हती ती देखील मिळवून देऊन त्याचा प्रवास सुलभ करून दिला. पण इतके करूनही त्याचा नवस फक्त दर्शन घेण्याचा असल्याने, त्याने दक्षिणा म्हणून देऊ केलेले जास्तीचे रु. ३५ बाबांनी घेतले नाहीत. या उदाहरणावरून स्पष्ट होते की बाबांना भक्तांनी आपले इच्छित प्राप्त झाल्याबद्दल आपल्याला काही द्यावे अशी मुळीच इच्छा नव्हती आणि नाहीही. अ. २९ मध्ये अहमदनगरचे शेट दामूअण्णा कापूस खरेदीच्या सौद्यात दोन लाख निव्वळ नफा मिळविण्याच्या आशेने मनातल्या मनात म्हणाले होते "साईनाथा! या व्यापारात साह्यता कराल तर नफ्याचा काही भाग मी आपल्या पायाशी अर्पण करीन." परंतु बाबांच्या हे लक्षात येताच "आपण नाही रे बापू किसमें" असे लगेच म्हणून बाबांनी त्यांना खजिल केले होते. असो.

आपण मात्र व्यावहारिक दृष्टीने बाबांना नवस करतो आणि त्यांना दुप्पट त्रास देतो. एकतर आपल्याला मदत करण्याकरिता ते स्वतः कष्ट भोगतातच आणि नंतर आपण नवस फेडावयास विसरलो किंवा त्यात काही अडचणी आल्या तर बाबांना तो फेडून आपल्याला ऋणमुक्त करावयास त्यांना

आणखी काळजी व खटपट करावयास आपण लावतो. केलेल्या नवसाची पक्की आठवण ठेऊन तो फेडण्यात नाईलाजाने दिरंगाई झाली असता स्वतःलाच कष्ट करून घेणारा चोळकरांसारखा भक्त विरळाच.

तेव्हां माझ्या मते बाबांना गाऱ्हाणे जरूर घालावे – आपली माऊलीच आहे ती – एकमेव आधारस्थान आहे. परंतु त्यासाठी मी असे करीन वगैरे नवस करू नये. त्यातून एखादा नवस की जो दुसऱ्या व्यक्तिच्या सहकार्यावर अवलंबून असेल तर तो मुळीच करू नये. उदाहरणार्थ अलिकडे बरेच भक्त श्रीसाईलीलेमध्ये आपला अनुभव छापून प्रसिद्ध करण्याचा नवस करतात मला वाटते यामुळे आपण श्रीसाईलीलेच्या संपादकांना कोड्यात टाकतो. अनुभव (आपणा स्वतःला अत्यंत महत्त्वाचा वाटला तरी) प्रसिद्ध करण्याइतका महत्त्वाचा असो वा नसो, लिहिलेल्या साहित्याचा दर्जा व शुद्धलेखन योग्य असो वा नसो व अंकात पुरेशी जागा असो वा नसो, संपादकांना तो नाकारता येत नाही. खरे म्हणजे बाबा भक्तांच्या हांकेला अजूनही धावून येतात हे गेल्या ६० वर्षाहून अधिक काळात जगजाहिर झाले आहे. तेव्हां त्याबद्दल आता (खास करून मराठी भाषेत तरी) लिहिण्याची फारशी गरज नाही. त्यातूनही श्रीसाईलीला दरवर्षी नोव्हेंबर–डिसेंबरचा दिवाळी जोडअंक खास अनुभव अंक म्हणून प्रसिद्ध करतेच.

त्यापेक्षा माझ्या मते बाबांनी आपण त्यांना गाऱ्हाणे घातल्यावर किंवा त्यांनी आपण होऊन आपली एखादी इच्छा पूर्ण केली किंवा संकटातून मुक्त केले तर नंतर आपल्या शक्तीप्रमाणे शिरडीस काही दक्षिणा पाठवून, शिरडीस स्वतः जाऊन समाधिचे दर्शन घेऊन किंवा नुसते घरी श्रीसाईसच्चरिताचे किंवा श्रीसाईनाथ अष्टोत्तर नामावलीचे पारायण करून बाबांकडे आपली कृतज्ञता व्यक्त करणे जास्त श्रेयस्कर होईल. हेमाडपंतांच्या मते तर हेही करणे अगदी अपुरे आणि तुटपुंजे आहे :–

"ऐशा उपकारा व्हावे उत्तीर्ण । ऐसे भावी तो अभक्त पूर्ण ।
दृश्यदाने उतराधीपण । स्वप्नीही जाण घडेना ॥ अ. ५१ ओ. १११॥
अखिल विश्वामाजील संपत्ती । देऊनि गुरुपकार फेडू जे इच्छिती ।
अमायिक दास्या जे मायिक अर्पिती । येणे का पावती उत्तीर्णता ॥११६॥

मग काय करायचे तर :–

म्हणोनी अनन्यश्रद्धापूर्ण । घालोनि दंडवत लोटांगण ।
मस्तकी वंदा सद्गुरुचरण । उपकार स्मरणपूर्वक ॥११९॥

भिमाजी पाटील देखील हेच म्हणाले होते –

दोन हात एक माथा । स्थैर्य श्रद्धा अनन्यता ।
नलगे दुजे साईनाथा । एक कृतज्ञता ते व्हावी ॥ अ. १३ ओ. १८०॥

# रक्षा बंधन

(श्रीसाई बंधुत्व कथा)

—श्री. ग. रा. पालकर
२३३।२, दारूवाला चाळ, बाझार वार्ड
कुर्ला, मुंबई—४०० ०७०.

सूर्य मध्यान्ही आला होता. रखरखत्या उन्हाच्या वाफेने सर्वांगातून निथळणाऱ्या घामाच्या धारा थोपविण्यासाठी नीता विजेच्या पंख्या समोर बसून, सामान्य ज्ञानाच पुस्तक चाळीत होती. आज तिच्या मुलाखतीची तारीख. दोन महिन्यापूर्वी तिच्या आत्याच्या यजमानानं कुठल्याशा औषध उत्पादन कंपनीत तिच्या नावे अर्ज केला होता. तेथून मुलाखतीस बोलावणं आलं म्हणून ती गेल्या आठवड्यात आत्याकडे मुंबईला आली होती. मुलाखतीतील संभाव्य प्रश्नांची ती मनो-मनी उजळणी करायची. तरीही अनपेक्षित प्रश्नाचं उत्तर जर वेळीच सुचल नाहीं तर? ...तर? या एका प्रश्नाने ती पुरती भांबावून जायची. आणि नेमकी याच वेळेस तिची आत्या—

"अग! साईबाबा सारं काही ठीक करील बरं!" असं म्हणत तिच्या डोक्यावरुन हळूवार हात फिरवायची. तेव्हां नीता एका वेगळ्याच अनुभूतीत गढून जाई. नीता आल्यापासून गेल्या आठवडाभर असं चाललं होतं.

"नीता! अग जेवायच नाही का? अजून कुठवर बसणार आहेस तू?"

"आत्या! मला किनई आज भूकच नाही बघ. पोट कसं भरल्या-भरल्या सारखं वाटतय."

"वे वेडाबाई! मुलाखतीला जायचय म्हटल तुला. अशा रिकाम्या पोटी जाणं बरं नाही. चल उठ बघू."

असं म्हणत आत्याने साईबाबांच्या तसबीरी पुढील दुपारच्या नैवेद्याचं ताट नीता पुढे ठेवले. आणि भूक नसून देखील प्रसाद म्हणून नीताला ते सारं संपवाव लागलं.

नीताची आत्या एक सुसंस्कृत घराण्यात वाढलेली स्त्री. नेहमीच्या हसऱ्या चेहऱ्यावर राग किंवा तिरस्काराच्या कोणत्याही छटा कधीच उमटत नसत. अंतःकरण कसं अगदी आपुलकी आणि जिव्हाळ्यानं भरलेलं. जणू पावित्र्य, सोज्वळता याची मोहक मूर्तीच, आणि या सुंदर देखण्या स्त्रीचं नावही तिला साजेसंच होतं. ते म्हणजे आनंदीबाई.

आनंदीबाईंच बालपण तसं धार्मिक संस्कारात गेलेलं. चातुर्मासातील व्रताचे कडक निर्बंध त्यांच्याकडे पाळले जात. नित्य ग्रंथ-स्तोत्र-नामावलीचे वाचन,

पारायण त्यांच्याकडे होत असत. तर पूजा अर्चा एकादशणी, या सारखे धार्मिक विधीही प्रसंगानुसार केले जात. त्यामुळे बालवया पासूनच अध्यात्मिक विषयाची त्यांना गोडी लागली होती. असं सांगतात की आनंदीबाईच्या वयाच्या दहाव्या वर्षी कोणा एका फकीराने त्यांना एक छोटस साई स्तोत्राच पुस्तक दिलं होतं. त्या पुस्तकातील साईस्तोत्र त्या आजतागायत नित्य नेमाने पठण करीत आहेत. त्यात कधीही खंड पडला नाही. आणि त्या क्षणापासून त्यांच्या प्रगतीची कमान-ही उंचावत गेली ती आज पर्यंत.

नीता काही त्यांच्या सख्या भावाची मुलगी नव्हे. ज्ञातीतील नव्हे किंवा स्वजातीतीलही नव्हे. माणसाच्या मनाची प्रगल्भता वाढली की सारं जग त्याला प्रेममय दिसू लागत. बंधुत्वाच्या सुप्तभावना जागृत होतात. अन् तो प्रत्येक प्राणीमात्रात मग ईश्वराच प्रतिबिंब पहात असतो. आनंदीबाईच्या बाबतीत असच घडलं होत. आई–वडीलांची ती एकुलती एक मुलगी. लहानपणी रक्षाबंधन भाऊबीज या सारखे सण आले की आपणास भाऊ नाही याची तिच्या बाल मनाला खंत वाटायची, मग खेळण्यातल्या बाहुलीला भाऊ करुन ती त्याला राखी बांधायची. ओवाळायची. पढे–पुढे ती फकीराने दिलेल्या साई-स्तोत्रालाच राखी बांधत असे. दिवाळीत भाऊबीजेला ओवाळीत असे तिच्या बालमनाची ही धडपड पाहिली की तिच्या आई वडीलाचं मन तिळ–तिळ तुटायचं. मग ते उभयता तिला जवळ घेऊन कुरवाळायचे. प्रेमाश्रूंनी न्हाऊ घालायचे.

स्वतःच्या मुलीची साईभक्ती पाहून, आनंदीच्या आई वडीलांनी तिला शिरडीला नेले. तेव्हां साईबाबांच्या मूर्तीवर ती इतकी आकृष्ट झाली की समाधि मंदिरात त्या मूर्तीसमोर ती तासन् तास बसत असे. आपल्या इवल्याशा हाताने समाधीवर पडलेल्या फुलांपैकी एक–दोन फुले दोऱ्यात गुंफून तो दोरा बाबांच्या मूर्तीच्या हाताला बांधत असे. जणू भाव फुलांची राखीच ती.

आनंदीच्या हट्टा खातर तिच्या आईवडिलांना प्रत्येक रक्षाबंधनाच्या वेळेस शिरडीला जावे लागे. त्यावेळेस छोटी आनंदी अभिषेकाच्या ताटात सुंदरशी राखी घेऊन, बाबांच्या मूर्तीला बांधत असे. त्यावेळी ते पाषाणाचे हातहि क्षण-भर तिला सचेतन झाल्या सारखे वाटत.

अशाच एका रक्षाबंधनाच्या दिवशी शिरडीत आनंदीला भाऊ भेटला. अगदी अकल्पितपणे, तिच्याहून चार–पाच वर्षांनी मोठा असलेला. गोरा–गोमटा, नाकी–डोळी सरळ, सडपातळ, देखणा अगदी–अगदी तिच्या सारखा. तेव्हां कोण आनंद झाला तिला. तो प्रसंग आजहि तिच्या मनात नुकत्याच उमललेल्या फुला सारखा टवटवीत आहे.

आजच्या सारख तेव्हां शिरडीच वैभव इतक काही अफाट नव्हत. यात्रेकरूंची सोयही तेव्हां आजच्या सारखी होत नव्हती. एक दोन इमारती, जुनी पण शेणामातीने सारवलेली घरे, आजू–बाजूला झाडी–झुडप, छोटस भोजन गृह, रात्रंदिवस यात्रेकरूंच्या सुखसोयीसाठी राबणारा संस्थानचा कर्मचारीवर्ग तेव्हां होता. पण दिवसें–दिवस वाढणाऱ्या यात्रेकरूंच्या संख्येमुळे हवी तशी सोय करणे निव्वळ अशक्य प्राय होत. म्हणून जिथे जिथे जागा मिळेल, तिथे–तिथे भाविक मंडळी आपल बस्तान ठोकीत, अगदी उघड्यावर सुद्धा. आभाळाच्या छता खाली.

आनंदीच्या आईवडिलांनी अशाच एका ठिकाणी आपल बस्तान मांडल. तेव्हां त्यांच्या बाजूला नागपूरच एक तरुण जोडप आपल्या चार वर्षाच्या चुण–चुणीत बोलणाऱ्या मुलीसह तेथे स्थानापन्न झाले होते. पौर्णिमेच्या आदल्या दिवशीच टपोर चांदण, श्रावण महिन्यातला आल्हादकारक गारवा. यामुळे दिवसभरच्या प्रवासाच्या दगदगीने आनंदी आणि तिचे आईवडिल केव्हांच निद्राधिन झाले होते. त्या दिवशीच्या मध्यरात्री दोन–तीन अज्ञात इसमांनी त्यांच्या सामानासह मौल्यवान ऐवज लांबविण्याचा प्रयत्न चालविला होता. तेव्हां नागपूरच्या त्या तरुणाने त्यांना जोरदार प्रतिकार केला. आरडाओरड झाली. पण पळता पळता त्या इसमांनी नागपूरच्या तरुणाला बरीच दुखापत केली. झालेल्या जखमांनी तो तरुण निचेष्ट पडला होता. त्याची पत्नी अन् मुलगी टाहो फोडून रडू लागली. आपल्यामुळे त्या तरुणावर ओढवलेल्या प्रसंगाने आनंदीसह तिचे आईवडिल हळ–हळले, भोवतालचे भाविक गोळा झाले. त्यांनी ग्रामस्थांच्या सहाय्याने घरगुती औषधोपचार करून त्या तरुणाच्या वाहणाऱ्या जखमा बांधल्या. मग त्या रात्री कुणीच झोपल नाहीं. रात्रभर या भयाण प्रसंगाची चर्चा भाविकात सर्वत्र चालू झाली. ती पहाटेच्या काकड आरती पर्यंत. काकड आरती नंतर जो तो आपापली स्नान–संध्या आटोपून समाधी मंदिराकडे वळू लागला. आनंदीच मन खट्टू झाल. ती मनातल्या मनात साईबाबांना दोष देऊ लागली.

"बाबा! अस व्हायला नको होत हो, बाबा! अस व्हायला नको होत." पण तिच्या मनातील बोल साईबाबांना कळत होते का?

त्या तरुणाच्या कुटुंबाच सांत्वन करीत, आनंदी व तिचे आईवडिल त्या तरुणा शेजारी बसले होते. त्याला या अवस्थेत सोडून, बाबांच्या दर्शनाला जायची त्यांना इच्छाच होईना.

काकड आरती नंतर समाधी मंदिरात बाबांच्या मूर्तीला व समाधीला प्रातः–स्नान घालण्याचा कार्यक्रम सुरू झाला होता. लाऊडस्पिकर वरून भक्तीगीताच्या ध्वनीमुद्रिकांनी सार वातावरण भक्ती गंधात न्हाऊन निघत होत. त्याच वेळेस

एक लक्तरलेल्या देहाचा, जुनाट मलीन कपडे घातलेला, काखेत झोळी अडकलेला म्हातारा, शोध घेत–घेत त्यांच्या जवळ आला. आणि जखमा बांधलेल्या अवस्थेत विव्हळत असलेल्या त्या तरुणाजवळ जाऊन, त्याच्या कपाळावर हात ठेवित म्हणाला

"काय झाल माझ्या राजाला? उगी–उगी हं! ... आन्–आन् हे काय?" अस म्हणत बांधलेल्या जखमा सोडून पाहू लागला. त्याला प्रतिकार करावा अस तिथे असलेल्या आनंदी अथवा तिच्या आईवडिलांना व त्या तरुणाच्या पत्नीलाही वाटल नाहीं.

"लई दुखापत झालीया न्हव. थांब ... थांब आत्ताच बर करतु तुला." अस म्हणत म्हाताऱ्याने झोळीतून कोणत्यातरी आणलेल्या झाडाचा पाला काढून हातावर चुरगळला. त्याचा रस झोळीतल्या एका कळकटलेल्या बीन मुठीच्या कपात ओतला. व झोळीतून चिमुटभर राख घेऊन, या रसात कालवली व ते मिश्रण जखमांवर लावून, त्या जखमा होत्या तशा बांधल्या आणि सर्वांकडे किल–किल्या नजरेने पहात त्याने आपल्या तोंडाचा पट्टा पुन्हा सुरू केला. "काई भियाच कारन न्हाय बगा. तासाभरात सार काई ठीक होईल. मग तुमी समदीजन आगूल करुनशी दरशनाला जावा. आन तिथ- बी इभूती हाय न्हव, ती लावा. अक्षी बर वाटल बगा. आन तस झाल न्हाय तर येतूयाच मी बीगी बीगी ... त्या ... त्या (अस म्हणत त्याने दिशा दाखवली) ... त्या तकड, पल्याडल्या वस्तीत न्हातूया म्या." आणि तो म्हातारा जायला निघाला. पण काहीतरी आठवल्यामुळे आनंदीजवळ येत म्हणाला. "आज राखीचा सण, ममईस्नी तू राखी घिवून शान आलीस न्हव. तवा आता यालाच राखी बांध. किरीसना वानी रक्षान करील ह्यो तुज. बाबास्नी काय सारीच राखी बांधल्यात". आणि सुरकुतलेल्या चेहऱ्यावर हास्याची लकीर उमटवीत तो म्हातारा दूर–दूर निघून गेला. भारलेल्या नजरेने सारेजण तो जात होता त्या दिशेकडे पहात होते, व अंतर्मुख होऊन त्याचे गांवढळ बोल पुन्हा पुन्हा आठवित होते.

त्या तरुणाच्या वेदना आता बऱ्याच थांबल्या होत्या. तो उठून बसण्याचा प्रयत्न करू लागला. तेव्हां कलंडला जाऊ नये म्हणून आनंदीने त्याचा हात धरून त्याला बसवण्यास मदत केली. तेव्हां तिच्या सर्वांगातून एक अनामिक संवेदना चमकून गेली. जेव्हां–जेव्हां ती बाबांच्या पाषाणरूपी हाताला राखी बांधत असे तेव्हांचा तो सचेतन स्पर्श. अगदी तोच स्पर्श तिला त्या तरुणाच्या हस्तस्पर्शात जाणवला.

आळी–पाळीने सर्वांनी स्नान संध्या उरकून समाधी मंदिरात प्रवेश केला. समोर साईबाबांची नित्याचीच मूर्ती. पण आनंदीला त्या मूर्तीत कधी बाबा. तर कधी तो तरुण दिसे. पापण्यांची उघडझाप न करता ती एकटक त्या मूर्तीकडे देहभान विसरून पाहू लागली. तरीहि तिला त्या मूर्तीत कधी बाबा तर कधी तो तरुण दिसे. पुन्हां–पुन्हां तेच–तेच. सकाळी भेटून गेलेल्या म्हाताऱ्याचे बोल आता तिच्या अंतःकरणाच्या खोल गाभाऱ्यात पुन्हां–पुन्हा घुमू लागले.

"याला राखी बांध, किरीसना वानी रक्षान करील ह्यो तुज." "याला राखी बांध, किरीसना वानी रक्षान करील ह्यो तुज."

अगदी भारावलेल्या अवस्थेत आनंदी हळू हळू समाधी जवळ जाऊ लागली. समाधि मंदिरात बसलेल्या सर्व भाविकांच्या नजरा तिच्याकडे लागल्या तर समाधीच्या सभोवार बसलेल्या भक्तजनांना अभिषेक विधि सांगणाऱ्या भटजीने पुढे येऊ नको अशी तिला हाताने खूण केली, पण आनंदीला याचं काहीच भान नव्हतं. ती याच अवस्थेत हळू हळू समाधी जवळ गेली. हातातील राखी समाधीला लावून बाबांच्या मूर्तीकडे पहात पहात तिने त्या तरुणाच्या हाताला राखी बांधली. भाऊ–बहिणीचे नवीन बंध जुळले गेले. चुण–चुणीत बोलणारी ती मुलगी आनंदीला आत्या–आत्या करीत बिलगली. आनंदीने तिचं गोड चुंबन घेत तिला तिच नाव विचारलं, तेव्हां ती आपल्या बोबडया शब्दात म्हणाली "नीता!"

दुपारी सर्वांनी संस्थानच्या भोजन गृहात जेवण घेतले. कोणाही अनोळखी व्यक्तीने त्या सर्वांकडे पाहिलं असतं तर त्याला ते एकच कुटुंब असं वाटलं असतं.

त्या तरुणाच्या जखमा आता पूर्ण बऱ्या झाल्या होत्या सकाळच्या त्या म्हाताऱ्या विषयी सर्वांच्या मनात कुतूहल होतं. डॉक्टरांच्या औषधाने चार–पाच दिवसात ज्या जखमा भरून निघाल्या नसत्या, त्या जखमा काही तासातच पूर्ण बऱ्या झाल्या होत्या. म्हणून त्या म्हाताऱ्याचा शोध करून, त्याची भेट घेऊन त्याचे आभार मानणे अगत्याचे होते. त्याने सांगितलेल्या व दाखविलेल्या दिशेने त्याच्या वस्तीची ग्रामस्थांकडे आनंदीच्या वडिलांनी चौकशी केली तेव्हां त्यांना समजलं. म्हाताऱ्याने दाखविलेल्या दिशेला मैलभर काय, पण पांच–सहा मैलापर्यंत कोणतीच वस्ती नाही. आनंदी–आनंदीचे आई वडिल, तो तरुण त्याची पत्नी, साऱ्यांच्या मनात एकाच प्रश्नाच काहूर उठलं "तो म्हातारा कोण होता?

(पान ५३ वर पहा)

# साई चरणी निष्ठा ठेवा

—सौ. मालती जे. गाळवणकर
१११ । ११ बी, प्रभात रोड,
पुणे ४११ ००४

* श्रीसाईबाबांच्या चमत्काराने असंख्य साईभक्तांना अनेक अनुभव आलेले आहेत. श्रीसाईबाबा म्हणजेच साक्षात् चमत्कार! त्यांच्यापायी आपण श्रद्धा आणि सबुरी ठेवली की आपली मनोरथे सहज साकार होतात. आजच्या विज्ञान-युगातसुद्धा आपण असे म्हणू शकतो की विज्ञानशास्त्र कितीही पुढे गेले असले तरी साईबाबांच्या उदीचे महत्त्व मात्र कमी झालेले नाहीं. कारण तिचा गुणच तितका प्रभावी आहे. आजसुद्धा अनेक व्याधि-रोग केवळ श्रद्धापूर्वक उदी लावून व साईचरणी निष्ठा ठेवून बरे होतात. अर्थात नास्तिक माणसाला हे कितपत पटेल, ते मला माहित नाहीं. परंतु नास्तिक माणसाला सुद्धा आस्तिक बनवण्याची ताकद बाबांच्या उदीत आहेच.

माझ्या यजमानांची प्रकृती मध्यंतरी खराब झाली होती. त्यांचे जे जे मित्र भेटतील ते म्हणत 'की काय रे तुझी तब्येत फारच खराब झाली'. तेव्हां मी साईबाबांना "ह्यांची तब्येत सुधारू दे. मी साईलीला मासिकात माझा अनुभव देईन" असे म्हटले होते. त्यानंतर काहीच दिवसात आम्ही डॉक्टरकडून सर्व तपासून घेतले. तेव्हां त्यांना हृद्रोगाचा सौम्य झटका येऊन गेल्याचे कळले. परंतु ती डॉक्टरकडे जाण्याची बुद्धि श्रीसाईबाबांनीच आम्हांला दिली. त्यामुळे वेळीच कळल्यामुळे त्यांना ३-४ महिने आराम करता आला व श्रीबाबांच्या कृपेनेच त्यांची तब्येत सुधारली.

हा अनुभव वाचून अनेक वाचक प्रेरित होवोत व ज्यांना काही त्रास असतील त्यांना श्रीबाबांच्या प्रभावी उदीचा व त्यांच्यावरील श्रद्धेचा लाभ होवो ही श्रीसाईचरणी प्रार्थना.

*oooooo*

# भाव तिथे देव

—श्री. बाळकृष्ण अ. देसाई.
१५१, भांगरवाडी, लोणावळा ४१० ४०१

* शिरडीत सर्वत्र नामसप्ताह सुरू झाले. गळ्यात वीणा अडकवून कुणी रामनाम, कुणी हरीनाम कुणी विठ्ठलनाम अहोरात्र गाऊ लागले. समोर मात्र साक्षीला बाबांचा फोटो ठेवलेला.

काका दिक्षीत दिवसा नाथ भागवत रात्री भावार्थ रामायण वाचीत. जोग भोजनानंतर दुपारी मशिदीत जात. बाबांच्या पायावर मस्तक ठेवीत नि नमस्कार करीत. कधी एकनाथी भागवत वाचीत. शेवटी निरूपणानंतर जमलेल्या स्त्री–पुरुषांना उदी लावून प्रसाद वाटीत. असं सारखं त्यांचं चाललं होतं.

लोक बाहेर पडले की, परस्परात म्हणत, 'पाहिलंत, बाबा मशिदीत सर्वांना हेच सांगतात, नि पोथी पुराणातही भगवानानी हेच सांगितलं आहे. बाबा मोठे धोरणी. लोकांनी श्रवण भक्ती करावी, परस्परात विचाराची देवाणघेवाण करावी नि सन्मार्ग आचरावा ही त्यांची आंतरिक शिकवण.

कधी कधी बाबा इतके रागावत ,की त्यांच्या पुढं उभं रहाणं कुणालाहि दुरापास्त व्हावं. पण अंतःकरण मात्र निर्मळ, पवित्र जणू अमृताचा झराच. जसं जो भेटेल तसा त्याला ते उपदेश करीत. त्यांची पारख अचूक असे.

भक्त भावार्थी असेल तर स्वप्न पाडून झोपेतून त्याला जागे करतील, नि सांगतील, 'तू एखाद्या मंत्राचा जप कर!' कुणी उतावळा भक्त असेल, तर त्याला सांगतील 'धीर धर झाड लावलस ना, आता त्याची चांगली जोपासना कर. योग्यवेळी त्याला कळी, फुल–फळ येतील!, पण तोच कुणी आडमुठा भक्त असेल तर, त्याची मान पकडतील अन् म्हणतील 'मुरगळून चोळा मोळा करुन टाकीन बघ ! याद राख नि हे ढोंग बंद कर ! असे बाबा सर्वज्ञ व सर्वगामी होते, म्हणून वेषान जरी मुसलमान वाटले, तरी अंतर्यामी ते धर्मातीत होते, देवाचा अवतार होते.

आपण कितीतरी सत्पुरुषांची चरित्र वाचली आहेत. संत म्हटला की तो क्रोधरहित, भिक्षापात्र न अवलंबणारा नि एकांतप्रिय असा असतो. बाबांच मात्र सारच विचित्र. ते एकदा कुणावर रागावले, की इतके रागावतील, बडबडतील, शिव्या देतील की त्याला सुमार नाही. पण लगेच इतके थंड होतील की बर्फासारखे. अन मऊ तर लोण्यासारखे.

'भिक्षापात्र अवलंबिणे जळो जिणे लाजिरवाणे' हे रामदासी वचन. बाबांचं ह्याचा उलट. ते पाच घर फिरतील नि मिळालेली भिक्षा काही स्वतःसाठी ठेवून उरलेल्याचे वाटेकरी कुत्रा, मांजर, पक्षी यांना करतील.

बाबा एकातप्रिय नव्हते. भोवती जमणारे लोक कोणत्या धर्माचे व पेशाचे आहेत, इकडे त्यांचं लक्ष नसे त्यांना माणस हवी होती सर्व धर्मीय गुण्यागोविंदानं एकत्र येऊन गळ्यात गळा घालणारी, परस्परांच्या सुख-दुःखात वाटेकरी होणारी, जात-पात मानण त्यांना बिलकूल पसंत नसे. सर्व माणसं देवाची लेकरं. परस्परांशी नात बंधु-भगिनीच त्यात भेदभाव करणं त्यांना आवडत नसे. एकत्र भोजन, एकत्र रहा नि परस्परांना जपण हे त्यांच ध्येय होत.

बाबा म्हणत, कुणीही यावं प्रेम-भक्ति-सेवा करावी, नि फळाची इच्छा सबुरीनं धरावी. धीर धरला की, इच्छित प्राप्त झालच म्हणून समजाव. मात्र हृदयात भक्तीचा अखंड झरा वाहाता असला पाहिजे.'

बाबांच्या भोवती जमणाऱ्या भक्तांच्या हृदयात काय चाललंय हे ते तात्काळ ओळखीत नि त्याला तुला काय केल पाहिजे हे सांगीत. एकदा दासगणू त्यांना भेटायला आले. बाबा म्हणाले, 'अरे गणू! तु अखंड नामसप्ताह कर. तुझ्यामुळे पुष्कळांचा फायदा होईल.'

गणू म्हणाले, 'बाबा, मी पंढरीच्या विठ्ठलाचा भक्त. मला विठ्ठलाच दर्शन होणार असेल तर सार जीवन अखंड नामसप्ताहाने उजळून टाकीन!'

'अरे, तुझा पांडुरंग का पंढरीतच असतो? तो म्हणतो, "नाहं वसामि वैकुंठे योगीनां हृदये रवौ। मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामी ॥" जीवाच्या आकांतानं हाक मार, नि बघ कशी मौज घडते ती!'

अन् काय चमत्कार! दास गणूनी सप्ताह पूर्ण केला, नि शिरडीत मशिदीत त्यांना 'विटेवरी उभा कटेवरी हात' घेतलेल्या पांडुरंगानं त्यांना दर्शन दिलं. तीच गोष्ट काका दिक्षितांची. पहाटे उठून स्नानसंध्यादि प्रातःकर्मे उरकून आसनावर ध्यानस्थ झाले, तोच तीच विठ्ठलमूर्ति त्यांच्या समोर उभी. त्यांनी भगवंतापुढे लोटांगण घातलं नि, मशिदीत बाबांच्या दर्शनाला आले.

बाबांनी दिक्षितांना पहाताच 'काय, काका! पंढरीचा विठोबा पाटील आला होता ना तुमच्या घरी? आता असं करा, चांगलं मजबूत दोरखंड आणून बांधून ठेवा त्याला तुमच्या घरी!'

देव देवळात नसतो. पंढरपुरी नसतो. तो भक्तांच्या हृदयात असतो' हे गणूला नि दिक्षितांना बाबांनी हुबेहूब पटवून दिलं.

भक्त कुठेही असो. शिरडीत पंढरीत किंवा देहू आळंदीत. त्याची निर्लेप सेवा कुठेही बसून करता येते. एके ठिकाणी ठिय्या मारून बसणारा तो कसला देव? ते ठरेल एक मातीचं किंवा दगडाचं निर्जिव बाहुलं! तो दामाजीच्या मदतीला महाराच्या वेषात गेला. तुकारामाच्या शेजारी बसून त्याला अभंग रचण्याची स्फूर्ति दिली. नि त्यानेच श्री ज्ञानोबांना हात धरून समाधिगृहात नेऊन बसवलं. जनाबाईला दळण दळण्यास मदत केली. नामदेवाचा नैवेद्य त्याच्या समोर खाल्ला. अन् मीराबाईला दिलेले विष स्वतः प्राशन करून तिला विषाच अमृत करून दिलं.

नाना नाटकी देव बाबांच्या रूपान गवळ्याच्या रूपात, भगवान श्रीकृष्ण गोकुळात शिरडीत अवतरला नि भक्तांच्या इच्छा पूर्ण करून त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तिथंच ठाण मांडून बसला. 'जय साई । जय बाबा!

# श्रीबाबांची कृपा

—सौ. मीनाक्षी राजुरकर,
४६, नेताजी सुभाष मार्ग, इंदूर

* परम श्रद्धेय बाबांच्या चरणी कोटी–कोटी प्रणाम. बाबा विषयी काही लिहावयाचे म्हणजे शब्दच अपुरे पडतात. शब्दरूपी फुलांचा हार बाबांना घालतांना त्यात कोणती फुले गुंफावित हाच प्रश्न पडतो, प्रत्येक पाऊलावर बाबा आपल्याला सहाय्य करीत असतात हा अनुभव मला नेहमीच येतो.

एकदा माझा मुलगा ३ वर्षाचा असतांना खूपच आजारी झाला. त्याला टॉयफाईड झाला व तो नंतर रिलॅप्स झाला एके रात्री त्याची तब्येत खुपच बिघडली होती घरात मी व माझे पति आम्ही दोघेच होतो मला जरा झपका लागला तेव्हा स्वप्नात येऊन बाबांनी सांगितले की तुझा मुलगा खूप आजारी आहे ना? त्याला हे तीर्थ देतो ते दे व अंगारा लाव सकाळी ४ वाजता तो उठला व मला म्हणाला "मम्मी मला उठव" मी म्हणाले "चल उठ" तर त्याला उठताच येईना तो रडावयास लागला "मला उठता येत नाही" असं म्हणून आम्ही दोघेही खूपच घाबरलो आणि खूपच रडू फुटले. एकदम मला रात्रीच्या स्वप्नाची आठवण झाली व मी म्हणाले की लौकर बाबांची उदी आणा मी लहानपणापासून श्री गजानन महाराजांच्या व बाबांच्या पोथीचे पारायण करीत असते त्यांची उदी घरी असतेच ती त्याच्या सर्व अंगाला भराभर लावली व थोडी पाण्यात घालून पाजली आणि काय आश्चर्य! ८–९ वाजेपर्यंत त्याला बरे वाटले डॉ. कडे नेले तर ते म्हणाले की याला काहीं सुद्धा झालेले नाहीं आता काय झाले होते व कोणी बरे केले हे आम्हांलाच ठाऊक आहे

अगदी मागचाच अनुभव म्हणजे मागल्या वर्षी माझ्या वडीलांची प्रकृति खूपच बिघडली होती २ महिने त्यात गेले जानेवारीत भावाचे लग्न त्यात दिवस गेले त्यामुळे माझ्या मुलांचा अभ्यास झाला नाही. पूर्वी बोर्डाची परीक्षा, नंबर चांगलेच यायला हवेत पण अभ्यास झालेला नव्हता विचार केला बाबांच्या नातवाची फिकीर बाबांनाच त्यांनी मुलांकडून सर्व करवून घ्यावे आणि खरच बाबांनी कसे शिकवले त्यांनाच माहित. त्याला खूपच चांगले मार्क्स आहेत ही सर्व बाबांचीच कृपा आहे असं मी समजते. असेच त्यांचे कृपा छत्र नेहमीच आमच्या डोक्यावर असावे व हाक मारताच त्यांनी यावे हीच त्यांच्या चरणी प्रार्थना.

# जगा लावावे सत्पथि

—कु. हेमलता न. केसकर,
घर नं १८४ कसबा पेठ,
फलटण, जिल्हा सातारा,
फलटण ४१५ ५२३

* मनुष्याचे जीवन हे विविधतापूर्ण आहे. त्यामध्ये नित्य वेगवेगळ्या घटना घडत असतात काही प्रसंग क्षुल्लक असतात तर काही प्रसंग मनावर ठसणारे असतात. काही घटना आनंद देणाऱ्या असतात. तर काही घटना दुःख देणाऱ्या असतात. त्यामुळे ममुष्य कधी सुखाच्या हिंदोळ्यावर झोके घेत असतो तर कधी दुःख होणाऱ्या प्रसंगाने त्याचे मन हेलावून जाते. मनुष्याचे जीवन म्हणजे हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक इत्यादि रसांनी भरलेला पेलाच आहे!' जीवन व्यतीत करीत असतांना या विविध रसांचा आस्वाद मनुष्य घेत असतो.

मनुष्याला करुण रसामुळे निर्माण होणारे दुःख मात्र नको असते. कारण जीवनात मनुष्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. कुणाला रहायला जागा नसते, तर कुणी नोकरीच्या शोधात असतो, एखादा असाध्य रोगाने पिडलेला असतो, तर एखाद्या व्यक्तिजवळ खुप ऐश्वर्य असूनही ते भोगण्यास तो असमर्थ असतो.

जीवन म्हणजे अशा प्रकारे संकटाची मालिकाच आहे. मनुष्याला दुःख प्राप्त झाले की त्यातून मार्ग कसा काढावा हे त्याला समजत नाही. या दुःखा-तून पार पडण्यासाठी तो अनेक प्रयत्न करतो. आजारी मनुष्य औषधासाठी डॉक्टरांकडे जातो, वकीलाकडे कायद्याचा सल्ला घेण्यासाठी जावे लागते, त्या-प्रमाणे प्रापंचिक समस्येतून मुक्त होण्यासाठी श्री साईबाबा सारख्या सत्पुरुषाकडे धाव घेतो. वेगवेगळ्या प्रकारे मनुष्य श्री साईबाबांची उपासना करतो. कोणी त्यांच्या पोथीचे पारायण करतो, कोणी, भक्त नित्य नेमाने पूजा अर्चा करतो. कारण प्रपंचातील अडचणी दूर होण्यास किंवा दुःख सुसह्य होण्यसाठी साईबाबा हे अलिकडच्या काळातील थोर संत आहेत संत म्हणजे मनुष्याचा देह धारण केलेले परमेश्वरच होत. पारमार्थिक क्षेत्रात त्यांचा फार मोठा अधिकार असतो. परमेश्वराची कृपा संताच्या माध्यमातूनच प्रकट होत असते. आपल्या अतींद्रिय शक्तीने दृश्य जगाच्या पलिकडचे ते पाहू शकतात. त्यांना काही सिद्धी प्राप्त झालेली असते.

या सिद्धिच्या सहाय्याने ते गांजल्यागांजल्याचे दुःख जाणतात व ते दूर करतात. यालाच आपण चमत्कार किंवा लीला असे म्हणतो. देहरूपाने श्रीसाईबाबा नसले तरी श्रद्धेने भक्ति करणाऱ्याला त्यांचे अस्तित्व प्रतीत होते. महान संत साईबाबा देहरूपात असतानाही अनेक चमत्कार करीत. उदा. दीपावलीच्या सण असता आपल्या अचाट योग सामर्थ्याने पणत्यामध्ये पाणी घालून ज्योत पेटवली व साऱ्यांना आश्चर्यचकीत केले.

पण आजही लीलारूपाने श्रीसाईबाबा आहेत हे आपल्या अनुभवास येते. एखाद्या भक्ताने 'साईचरित्राचे पारायण केले व प्रसाद ग्रहणासाठी बाबांनी यावे अशी इच्छा केली तर कोणत्याही रूपाने बाबा येतात व त्या व्यक्तिला त्यांचे अस्तित्व प्रतीत होते. श्री बाबांकडे कोणीही संकटग्रस्त जीवाने जावे, या संकटातून मला वाचवा किंवा उपाय मागावा 'श्रीसाईबाबा हमखास त्याला संकटमुक्त करतील. श्रीसाईबाबांची कृपा झाली की असाध्य असे काही नाही. त्यांच्या कृपेमुळे कोणी कॅन्सरसारख्या असाध्य रोगातून बरा होतो, तर कोणाचे ऑपरेशनच टळते. श्रीसाईबाबा असे शारिरीक दुःख दूर करतात. त्याचबरोबर प्रपंचातील समस्याही श्री बाबांच्यामुळे दूर होतात. कोणाला रहायला जागा मिळते, तर कोणी परीक्षेत उत्तीर्ण होतो. जशी व्यक्तिची भक्ती असेल श्रद्धा असेल तशी त्यास प्रचिती येते. 'नित्य मी जिवंत, जाणा हेचि सत्य । नित्य घ्या प्रचिती अनुभवे' — याप्रमाणे प्रत्येकाचे अनुभव वेगवेगळे आहेत. अनुभव घेणारे वेगवेगळे आहेत. अनुभवाचे स्वरूप वेगळे आहे, पण अनुभव देणारे 'श्रीसाईबाबा हे एकमेव आहेत.

फुलांचा सुगंध जसा मनुष्याला आकर्षित करतो, त्याप्रमाणे 'साईलीला वाचल्या की मनुष्याच्या मनात श्रीसाईबाबा म्हणजे कोण हे जाणून घ्यायची इच्छा निर्माण होते. कारण साईभक्तांनी स्वतःच्या शब्दात वर्णन केलेले हे अनुभवाचे बोल आहेत. त्यात सत्यता, स्वानुभूति त्याप्रमाणेच श्रद्धा आहे. भाषाशैली साधी व सरळ आहे. साईभक्तांचे ते प्रामाणिक निवेदन आहे. तसेच सर्व 'लीलांमध्ये बाबांच्यावर भक्ताची असलेली श्रद्धा, भक्ति प्रगट होते. श्री साईबाबांच्यामुळे मी अडचणीतून निभावलो किंवा बाबांनीच माझी इच्छा पूर्ण केली ही दृढश्रद्धा शब्दातून प्रगट होते.

अशा प्रकारच्या अनेक 'साईलीला' कडे वरवर पाहिले असता असे वाटते की श्रीसाईबाबांची भक्ति केली त्यांच्यावर श्रद्धा ठेवली की आपले मनोगत पूर्ण होतात. सागरात जशा लाटा निर्माण होतात व त्या सागरातच विरून जातात,

पुन: निर्माण होतात, पुन: त्या सागराशी मिळून जातात. त्यामध्ये सहजता आहे, त्याप्रमाणे श्रीसाईबाबा सहजपणे चमत्कृति घडवितात, त्यालाच आपण 'लीला' असे म्हणतो. कारण जेव्हां आपण प्रयत्नाने एखादी गोष्ट करू शकत नाही, किंवा आपण असमर्थ असतो अशा वेळी श्रीबाबांचा धावा आपण करतो आणि जे मानवी शक्तीला असाध्य ते श्री साईबाबा सहजपणे लीलया साध्य करतात. यामुळे अश्रद्ध मनुष्यही श्रद्धाळू बनतो. नास्तिकाच्या मनातही आस्तिक भावना निर्माण होते. श्रीसाईबाबांच्या रूपाने परमेश्वर आहे हे कळते. हात आपोआप जोडले जातात व मस्तक साईचरणी नम्र होते.

'साईलीला' हे एक माध्यम आहे. त्या माध्यमातून अश्रद्धाच्या मनात श्रद्धा निर्माण व्हावी. जडजीवाने ईश्वरी मार्गाला लागावे, हा श्रीबाबांचा हेतू आहे, केवळ भक्ताची इच्छा पूर्ण करणे, भक्त ज्याची अपेक्षा बाळगेल ते त्याला देणे हे बाबांचे कार्य नाही.

'जगा लावावे सत्पथि
हेंचि साईलीलेची कृति

यातून साईबाबांच्या चमत्कारांचा हेतू स्पष्ट होतो की 'जगा लावावे सत्पथि' म्हणजे जगाला हा शब्द खूपच व्यापक अर्थाने योजला आहे. जगातील सर्वांना यामध्ये सर्व जातीधर्मांचे सर्व स्त्रीपुरुष मुले या सर्वांना सत्पथि म्हणजे सन्मार्गाला लावावे या उद्देशानेच 'साईलीला' होत असतात.

जीवनाचा मार्ग आक्रमीत असता पुष्कळ वेळा आपल्या हातून चुका होतात. सर्व घटनांचे कर्तृत्व आपण स्वतःकडे घेत असतो. वाईट घडले की मात्र आपण देवालाच दोषी धरतो. परमेश्वरावर श्रद्धा न ठेवता आपण विज्ञानाचा पुरस्कार करतो. या गोष्टींचा त्याग करून आपण आपले मनःसामर्थ्य वाढविले पाहिजे. श्री साईबाबांच्या चमत्कारांचे मनन केले की हे सहज शक्य आहे. आपण आपले कोणतेही काम असो, ते चांगल्या प्रकारे पार पाडावे, कोणाला दुःख देऊ नये, सत्याने वागावे, कोणाचाही द्वेष करू नये, इत्यादि जे नीति-नियम आहेत ते आचरणात आणाव, आपण कर्तव्य करीत असता परमेश्वरावरही श्रद्धा ठेवावी. हीच साईबाबांची एक प्रकारे निरपेक्ष भक्ति आहे. काहीतरी हेतू मनाशी धरून भक्ति केली तर ती सापेक्ष भक्ति होईल. आपण सापेक्ष भक्ति करीत असता निरपेक्ष भक्ति करण्यास शिकले पाहिजे. त्यासाठी स्वतः-पासून सन्मार्गाला लागण्याचा प्रयत्न केला पाहिजे. 'साध्याही विषयात आशय असे मोठा!' याप्रमाणे श्रीसाईबाबांच्या 'साईलीला' म्हणजे अनेक छोटे मोठे पण चमत्कृतियुक्त प्रसंग आहेत व त्यापासून आपल्याला खूप शिकता येते, बोध घेता येतो.

# शिर्डी साईबाबा व शिकवण

—श्री. रमेश डी. चव्हाण
साईनिकेतन, गुजरलेन,
मु. पो. ता. नवापूर, जि. धुळे,
पिन ४२५ ४१८

* शिर्डी—सद्‌गुरु साईबाबांच्या वास्तव्याने पुनित झालेली भूमी. येथेच साधारणपणे एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात साईबाबा एका लहान मुलाच्या स्वरूपात अवतीर्ण झाले आणि शिरडी या लहानशा गावाचे भाग्य उदयाला आले. साईबाबांच्या आधी शिरडी गावाची कुणाला ओळखही नसेल पण तेच शिरडी साईबाबांच्या वास्तव्याने महाराष्ट्रातच काय पण भारतात किंबहुना जगातसुद्धा आज सर्वांना ठाऊक आहे. शिरडी हे भाविकांचे नव्हे साईभक्तांचे श्रद्धास्थान झाले असून लांबलांबचे भाविक भक्त बाबांच्या दर्शनासाठी, नवस फेडण्यासाठी दररोज हजारोंच्या संख्येने येत असतात. दिवसेंदिवस यात वाढ होत आहे कारण आजच्या विज्ञानयुगात मानवाला धार्मिक समतेचे व एकात्मतेचे दिव्य सामर्थ्य केवळ शिरडीच्या साईबाबांच्या अलौकिक सामर्थ्यातच आहे.

शिरडीकरांच्या परमभाग्याने साठ वर्षे बाबांनी शिरडीत वास्तव्य केले आणि ह्या परिसराला महात्म्य मिळवून दिले. या साठ वर्षांच्या काळात बाबांनी कलियुगात पाखंडी जनतेला भक्तीमार्गाकडे खेचून आणून बंधुत्वाची भावना वाढविण्याचे लोकोत्तर कार्य केले. त्यांच्याकडे जो कोणी जाई त्याला सोईस्कर व त्याच्या परिस्थितीला अनुकूल होईल अशीच शिकवण ते त्याला देत असत.

बाबांची शिकवण, त्यांच्या लीला व त्यांचे जीवन ही एकमेकांत गुंतलेली आहेत. साईबाबांची शिकवण समजून घेणे म्हणजेच साईबाबांना ओळखणे ... जाणणे होय. साईबाबा हे आत्मसाक्षात्कार झालेले आत्मनिष्ठ असे गूढवादी होते. बाबांना अनेक सिद्धी अनुकूल होत्या. त्यांच्या बळावर वाटेल ते करू शकत. त्यांच्या जीवन लीलेतील एकेका क्षणाचे विश्लेषण करून पाहिले व त्यातील अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न केला तर आपणाला त्यांची शिकवण कळून येईल त्यासाठी एकच उदाहरण पुरेसे बोलके आहे.

एकदा बाबा मशिदीत बसले होते. अण्णासाहेब दाभोलकर म्हणजेच हेमाड-पंत बाबांचे पाय रगडीत होते. म्हाळसापती, बापूसाहेब बुटी, शामा, काकासाहेब दिक्षित आदि मंडळीही त्यावेळी तिथं हजर होती. गप्पागोष्टींना नुसता ऊत आला होता. मध्येच बाबा हसू लागले. काहीवेळाने खदखदून हसायला लागले. उपस्थितांना आश्चर्य वाटू लागले. हसण्याचे कारण कुणाला काही कळेना. अण्णासाहेब स्वतःशी विचार करू लागले आपल तर काही चुकले नाही ना?

तितक्यात आपले हसू आवरीत बाबा म्हणाले, "ऐकारे, आज मी एका चोराला पकडले आहे. हा हेमाडचा मघाशी एकटाच फुटाणे खात होता. हेमाडपंत चक्रावून गेले. त्यांना कळेना विनाकारण आपल्यावर आळ ठेवीत आहेत त्यासाठी ते म्हणाले "बाबा, सकाळपासून फुटाणे कसे आहेत ते सुद्धा मला ठाऊक नाही आणि उगीचच आपण माझ्यावर आळ लादता?"

त्यावर बाबा म्हणाले, "आपण उगीच नाही बोलत, माझ्याजवळ भर-भक्कम पुरावा आहे असे म्हणून बाबांनी फुटाण्याचे दोन–चार दाणे हेमाड-पंतांच्या कोटाच्या बाहीला चिकटलेले होते ते काढून दाखवले. कोट अंगात असला की तो दुमडतो त्याला वळ्या पडतात. त्या वळ्यातून बाबांनी एक–दोन नव्हे तर पाच–पंचवीस फुटाणे काढून दाखविले.

हेमाडपंतांना आश्चर्य वाटले. त्यांना फुटाण्याचे कोडे काही केल्या उलगडेना. फुटाणे आलेतच कसे? काही ...काही त्यांना कळेना तेव्हां मुकाट्याने त्यांनी अंगावर आलेली बाजू मान्य केली व बाबांना म्हणाले "बाबा आजपर्यंत जवळ असतील त्यांना आधी घास दिल्याखेरीज मी कुठलाच जिन्नस कधी एकट्याने खाल्ला नाही. एकटे खाण्याची खोड फार वाईट हे माझे मत असल्याने मी चोरून फुटाणे खाल्ले नाहीत हे मात्र तितकेच खरं आहे!

तेव्हां बाबांनी सांगितले, "अरे हेमाडचा! जवळ असेल त्याला तू देतोस पण जे जवळ नाहीत त्यांची कधी तुला आठवण होते काय? अरे समोरचे माणूस दिसते त्याला नवल म्हणता येत नाही पण समोर नसलेले माणूस आपल्या डोळ्यांना दिसलं पाहिजे. त्यांच्या आठवणीने ज्याच्या घशाखाली घास उतरत नाही त्याला मी 'माणूस' म्हणतो.

हेमाडचा, आपण रोज भाकर खातो पण त्या भाकरीत सर्वांचा भाग आहे हे जेव्हां आपण समजू शकतो तेव्हां जीवनात अर्थ आला असे मी मानतो. तोंडात भाकरीचा तुकडा घालण्या आधी ज्यांच्या तोंडातून भूक ओरडते आहे

अशांची विचारपूस करून त्याला काही भाग दिल्यावरच ती खाल्लेली भाकरी गोड लागेल. माणसानं आधी दुसऱ्याचा विचार केला पाहिजे. जो दुसऱ्याचा विचार करील त्याच्या जीवनात धर्म आला असे समजावे. माणसानं जिभेला हे शिक्षण दिले पाहिजे. जिभेला फार वाईट खोड आहे. मला आधी खाऊ द्या, मग राहिलेल दुसऱ्याला द्या. अशा जिभेला आवरून धरले पाहिजे. जिभेप्रमाणे तोंड, डोळे, कान आदि इंद्रियांनाही ताब्यात ठेवले पाहिजे. त्यांना नाही आवरलं तर उधळलेल्या घोड्यासारखी गत होते. घोडा खड्ड्यात व घोड्यावरचा माणूसही खड्ड्यात.

अशी बाबांची शिकविण्याची पद्धत होती. अशी बाळबोध शिकवण ज्यांना ऐकायला मिळाली ते धन्य होत.

साऱ्या जीवनभर बाबांनी दुसऱ्यांची दुःखे नाहीशी करून त्यांना सुखी करण्याचा अहर्निश प्रयत्न केला. बाबांचे जीवन हे अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी होते. बाबांच्या शिकवणीने माणसामाणसात प्रेमभाव वाढत जाई. आपसातील मतभेद व द्वेषभावना नाहीशा होत व सर्व मानव समाज एकमेकांच्या उत्कर्षासाठी झटे याdृष्टीने साईभक्तांनी वागण्याचा प्रयत्न केल्यास बंधुत्वाच्या भावनेने सारे भक्त जोडले जातील.

"सर्वेऽपि सुखिनः सन्तु
सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु
मा कश्चित दुःखमाप्नुयात ।।

बाबांनी अशा प्रकारच्या अनेक शिकवणी भक्तांना वेळोवेळी दिल्या आहेत. शिरडी सारख्या वैराण भागात बाबांनी अलौकिक कार्य करून शिरडीचे नंदनवन बनविले आणि म्हणूनच एक पावन तीर्थस्नान म्हणून शिरडीची ख्याती आज सर्व दूर आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे शिरडीच्या बाबतीत माझा एक हिन्दी शेर आठवतो तो असा –

"शिरडीसे बढकर
तीर्थ कोई दूसरा नहीं ।
कहीं भी जाकर आवो लेकिन
शिरडी जैसा आनंद नहीं ।।"

# श्रीसाईकृपा

—सौ. उज्वला अरविंद झारापकर, एम. ए.
झारापकर भवन, मुंबई – २८.

* माझा जन्म कोकणातील एका मध्यमवर्गीय पण सुसंस्कृत घराण्यात झाला. देवावर पूर्ण श्रद्धा ठेऊन अविरत मेहनत करण्याचे बाळकडू मला पाजण्यात आले व याच भांडवलावर मी आज यशाचे शिखर गाठले आहे.

सुरुवातीचे शिक्षण कोकणात झाले. सर्व विषय चांगले असून इंग्रजी कच्चे राहिले. त्यामुळे मुंबईत आल्यावर अभ्यास कठीण वाटू लागला. बरीच मेहनत घेऊन इंग्रजी सुधारण्याचे प्रयत्न केले व अशात चांगले शिक्षक लाभले व त्यामुळे मी थोड्याच कालात इंग्रजीवर प्रभुत्व संपादन केले व शेवटी एम्. ए. ला अर्थशास्त्र घेऊन पहिल्या श्रेणीत पास झाले.

याच शिक्षण कालात वडिलांवर माझा शिक्षणाचा भार पडू नये म्हणून शिक्षिकेचे काम करीत होते. मंत्रालयात प्रसिद्धि खात्यात सहज नोकरी मिळाली. व एम्. ए. होताच लेक्चरर म्हणून कॉलेजात नेमणूक झाली. पण नोकरी चालू ठेवण्याचा योग नव्हता म्हणून म्हणा किंवा दैवयोग म्हणा लग्न ठरले. नोकरी करणे माझ्या सासरी पसंत नसल्यामुळे चांगल्या नोकरीचा त्याग केला व सासरच्या व्यवसायात सामील झाले.

माझे वडिल निस्सीम साईभक्त, त्यांच्यावर बरीच गंडांतरे आली. पण आपल्या साईश्रद्धेमुळे वडिलांनी मार्ग काढला. या सर्व गोष्टीचा माझ्यावर अनुकूल परिणाम झाला व मीहि श्रीसाईबाबांची भक्ति सुरू केली. शिरडीस वडिलांबरोबर गेले. श्रीसाईसच्चरिताची पारायणे केली व याच दैवी सहाय्यामुळे मी आज यशाचे शिखर गाठले.

पडत्या काळात मी वडिलांना विचारीत असे की कुठे आहेत तुमचे साईबाबा आता? वडिल म्हणायचे जरा थांब व चमत्कार पहा. पण माझा विश्वासच बसत नसे. असेच दिवस चालले होते नंतर अचानक इतक्या जलद घटना घडल्या की माझ्या वरील प्रश्नाचे उत्तर मिळाले.

माझ्या लग्नात मी एकुलती एक मुलगी असूनसुद्धा अहेर घेतला गेला नाही. वडिलांच्या मते हुंडा व अहेर या गोष्टी त्याज्य आहेत. सर्वांचे आशिर्वाद म्हणजेच अहेर. पण यामध्ये अपवाद ठरले माझे वडिल. त्यांचा अहेर मी स्वीकारला. तो अहेर म्हणजे श्रीसाईबाबांची सुंदर तसबीर. वडिलांनी माझ्या जीवनांतील पुढील यशस्वी वाटचालीसाठी माझ्यामागे श्रीसाईरूपी शक्ति उभी ठेवली.

त्यानंतर अपयश हा शब्द मी कधीच ऐकला नाही. हा माझा अनुभव आज दि. १४–४–८३ गुढीपाडवा या मुहूर्तावर लिहिला जात आहे. आज तम्बर सेवेची यशस्वी पन्नास वर्षे वाटचाल करून आम्ही सुवर्णमहोत्सव साजरा करीत आहो. माझे सासरे गणपती भक्त, व मी साईभक्त म्हणजेच या यशामागे श्रीसाईगजाननच उभा आहे.

अशा या सुवर्णक्षणी मी श्रीसाईबाबांना विसरूच शकत नाही. म्हणूनच ही त्यांना आदरांजली. श्रीसाईबाबांचे प्रेम लावणारे माझे वडिल श्री. गणपतराव सामंत यांना धन्यवाद.

सर्व साईभक्तांना माझे प्रणाम.



# साईबाबांनी केलेली अजब कृत्ये

(१) गहू दळून त्याचे पीठ वेशीवर टाकले व शिरडी गावातील महामारी रोग घालविला.

(२) धुनीजवळच्या खांबावर सटक्याचे प्रहार करून धुनीतील प्रचंड ज्वाळा कमी केल्या.

(३) मोठ्याने गर्जना करून मुसळधार पाऊस थांबविला.

(४) धुनीमध्ये हात घालून भट्टीमध्ये पडलेल्या लोहाराच्या मुलीस वाचवले.

(५) आपल्या हाताने भुईमुगाच्या शेंगा रगडून त्यातील दाणे काका महाजनींस खावयाला दिले व त्यांची मोडशी थांबविली.

(६) मूठ वळून डाव्या हाताचे कोपर उजव्या हातात ठेवले व तो डावा हात फिरविला मिरीस्करांना दाखविला व त्यांना सर्पाबद्दल आगाऊ कल्पना दिली.

(७) "चढू नको भटुरड्या खाली उतर" असे शब्द शामाला उद्देशून बोलले व त्याचे सर्पदंशाचे विष उतरविले.

(८) आपल्या दोन्ही जांघेवर प्लेगच्या गाठी घेऊन खापर्ड्यांच्या मुलाला वाचवले.

(९) भक्त धुरंधर यांना बाबांनी चिलीम ओढायला दिली व तेव्हांपासून त्यांचा दमा कायमचा घालविला.

(१०) "अरे वीरभद्राप्पा, अजून तरी शरम धरून वैर सोडून दे." असे बाबांनी म्हटल्याबरोबर सर्पाने आपल्या तोंडात पकडलेल्या बेडकाला सोडून दिले.

—श्री. माधव गजानन मोरे
विनायक बाग, बालाजी मंदिर मार्ग,
कुर्ला (पश्चिम) मुंबई–४०० ०७०.

# श्रीसाईंची लीला अगाध आहे

—श्री. आनंदा चाफेकर
द्वारा श्री. डी. बी. सूर्यवंशी
रिटा. डिस्ट्रिक्ट जज्ज
३५२ साकेत, इंदोर

* इंदोरला प्रत्येक गुरुवारी छावणीत मोठा बाजार भरतो, तीन महिन्यापूर्वी गुरुवारच्या बाजारातून मी भाजी व ज्यांच्या बंगल्यात मी रहातो त्या साहेबांची भाजी आणायला बाजारात गेलो. भाजी घेऊन आल्यावर मी साहेबांच्या भाजीचा हिशोब दिला व मी बंगल्यातच असलेल्या माझ्या क्वॉर्टरमध्ये गेलो. तेथे गेल्यावर मला आठवले की माझ्या सामानाची एक पिशवी मी बाजारातच विसरून आलो त्यात घेतलेल्या डाळी भाजी वगैरे असे १०–१५ रुपयांचे सामान होते. मी तर घाबरूनच गेलो होतो. बाजारात राहिलेली पिशवी परत सापडेल याची कोणालाच किंचित मात्र आशा नव्हती. कारण तेथे मी आलो त्यावेळी दीड दोन हजार लोक होते. शेवटी श्री साईबाबांचे स्मरण करीत व पिशवी मिळाल्यास प्रसाद वाटेन असे मनात म्हणत मी पिशवी शोधायला परत बाजारात गेलो. एवढ्या वेळात दीड तास निघून गेला. बाजारात जाऊन पहातो तर पूर्ण बाजार उठून गेलेला होता व पिशवी जेथे मी विसरलो होतो त्याच ठिकाणी तशीच ठेवलेली होती. त्यातली एक वस्तूही कमी झालेली नव्हती. हे पाहून मला फार आनंद वाटला व मी येताना प्रसाद घेऊनच आलो हा सर्व प्रकार पाहून श्री साईबाबांची लीला अगाध आहे असेच म्हणावे लागेल. श्री साई माऊलीची आम्हां सर्वांवर अशीच कृपा दृष्टी राहो हीच त्यांच्या चरणी प्रार्थना आहे.

# श्रीबाबांची अगाध अघटित लीला

—सौ. उषा प्र. अधिकारी
सावित्री सदन, बंदर रोड, रत्नागिरी.

* शिरडीत कोंड्या सुतार नावाचा बाबांचा एकनिष्ठ भक्त होता. बाबांचे त्याच्यावर इतराहून निराळ्या तऱ्हेचे प्रेम होते. एक दिवस दुपारच्या वेळी श्रीबाबा म्हणाले, "कोंड्या, खळवाडीत जा. तिथे गंजी पेटलीय ती विझवून ये." बिचारा कोंड्या घाबरला. तावडतोब खळवाडीकडे धावत सुटला. तिथे विचारपूस करता आगबीग काही नाही असे समजले तेव्हां बाबांकडे परत येऊन तो रुसण्याच्या स्वरात म्हणाला, "बाबा, काहीतरी सांगून मला दुपारच्या वेळी किती तरास दिलात देवा! गंजीला आग नाही नि काही नाही उगीच उनातून हेलपाटा पडला आणि माझे पाय मात्र पोळले." बाबा फक्त हसले. कोंड्याकडे एकटक पहात म्हणाले, "कोंड्या, मी कधीच असत्य बोलत नाहीं. मागे वळून पहा, तो बघ किती धूर पसरला आहे." बाबांचे बोल ऐकून कोंड्याने मागे वळून पाहिले तो खरेच. खळवाडी पेटली होती. जोराचा वारा सुटला होता. दुपारचे रखरखीत ऊन पडलेले असून लोक धावत येत आहे तोंडाने बाबा ... बाबा ओरडत आहेत रडत आहेत म्हणत आहेत बाबा का देवा कोपलात? खळवाडी अमुचा प्राण आहे बाबा. तिच्यावर आमचे जीवन ती जर पेटून खाक झाली तर आम्ही कुणाच्या तोंडाकडे पहायचे? मुले माणसे मरतील गुरेढोरे प्राण सोडतील. या संकटातून आम्हांला तुमच्याशिवाय कोण वाचवणार? तुमीच आमचे विष्णू, शंकर, गणपती, बाबा, बाबा या लेकरांकडे पहा. आमची दया येऊ द्या बाबा. श्रीबाबा म्हणजे शिरडीवासियांचा कलिजा, परमेश्वर. तो लगेच हेलावला आपला सटका हातात घेऊन ते लोकांबरोबर खळवाडीत गेले. मधल्या गंजीने पेट घेतला होता. तिच्या भोवती पाण्याची धार त्यांनी फिरविली व हातातला सटका जमिनीवर आपटला. आणि लोकांकडे वळून ते म्हणाले, "ही एवढीच जळेल. बाकीच्यांना धक्का लागणार नाहीं. ते सामर्थ्य कुणातही नाहीं तुम्ही शांत चित्ताने घरी जा." खरोखरच तेवढी एकच गंजी जळली पण जवळ चिकटून असलेल्या इतर गंज्यांना अग्नीचा स्पर्शही झाला नाहीं. लोक स्तंभित झाले अतिशय आनंदित मनाने श्रीबाबांना पुन्हां पुन्हां प्रणाम करीत बाबांच्या अलौकिक सामर्थ्याबद्दल एकमेकांशी चर्चा करीत निश्चित मनाने घरी गेले.

एकदा मध्यान्हीची वेळ होती आणि अकस्मात धुनीमाईने पेट घेतला. मोठमोठ्या ज्वाळा निघू लागल्या. पण जवळ जायला कुणाची छाती होईना. बाबा मात्र निवांतपणे बसून होते. ते काहीच हालचाल करीत नाहीत असे पाहून एकजण म्हणाला, "अरे, आपण पाणी आणून ती विझवू या." श्रीबाबांचा राग माहित असलेला दुसरा भक्त म्हणाला, "नको रे बाबा. बाबाच काय ते पहातील. आपण जर पाणी विझवायला आणले तर डोक्यात सटका बसेल त्याचे काय? पण बाबा शांतच राहिले तर ही द्वारकामाई आज सबंध जळणार. श्री बाबा अंतर्ज्ञानी भक्तांचे मनोगत जाणणारे. त्यांची मनाची घालमेल त्यांना कळल्याशिवाय कशी राहिल? ते उठले. त्यांनी आपला सटका हातात घेतला. ज्वाळांचा भयंकर उडालेला भडका पाहून ते धुनीपासून जवळच असलेल्या खांबावर सटका आपटून अग्नीला उद्देशून म्हणाले, "हे तू आज काय मांडले आहेस. सबूर ... सबूर." अग्नीने ती आज्ञा मानली आणि धुनी शांत झाली. लोकांनी दीर्घ निःश्वास सोडला.

श्रीबाबांना दीपोत्सवाचे फार वेड. ते रोज पणत्यात तेल घालून वाती घालून पेटवित सर्व मशिदीत लावीत आणि आनंदाने त्याकडे पहात काहीतरी पुटपुटत रहात. आरंभी वाणी दररोज तेलही पुरवित. एकदा मात्र सर्वांनी कट करून तेल देण्याचे नाकारले. सर्वांच्या अंतर्यामी आपण तेल देतो म्हणून हा पणत्या लावतो हा अहंकार होता तो बाबांनी जाणला. त्यांनी टमरेलात असलेले थेंबभर तेल पीऊन टाकले नंतर टमरेलात पाणी भरून ते सर्व पणत्यात घातले. वाती घातल्या व पुन्हां काहीतरी पुटपुटत काड्या लावल्या. रोज तेला-वर जळणाऱ्या पणत्या रात्रभर पाण्यावर जळत राहिल्या. श्रीबाबांची अग्नि-देवावर सत्ता असल्यानेच ही अशक्य गोष्ट घडून आली.

एके समयी श्रीबाबा धुनीजवळ बसून तोंडाने काहीतरी पुटपुटत होते. इतक्यात त्यांनी पटकन् धुनीत हात घालून काहीतरी उचलल्यासारखे केले. जवळ असलेले भक्त घाबरले आपल्या देवाचा परमकोमल गुलाबी हात भाजून काळा पडला असेल असे त्यांना वाटले. माधवरावांनी बाबांच्या कमरेला घट्ट मिठी मारून त्यांना बाजूला ओढले. तेव्हां त्यांच्याकडे प्रेमाने पहात बाबा म्हणाले, "अरे श्यामा, कशाला घाबरतोस वेड्या? माझ्या हाताला काही झाले नाही आणि होणार नाही. माझा एक लोहार भक्त आहे तो आणि त्याची बायको माझेच नामस्मरण करीत आपले काम करीत होती. त्याची बायको

कमरेवर लहान मूल घेऊन भाता फुंकीत होती. गडबडीत मूल हातातून निसटले आणि अग्नित पडले. ते मला लगेच कळले म्हणून मी अग्नीत हात घातला आणि त्या मुलीला अलगद उचलले. बरे तर बरे मुलीचा प्राण वाचला. मी अग्निला म्हटलेच होते की त्या चिमण्या जीवाला काहीही इजा करू नकोस माझी आज्ञा आहे. त्याप्रमाणे अग्निदेवाने माझे ऐकले आणि मुलगी सुखरूप राहिली. श्यामा, जे माझ्याकडे अनन्यभावाने पहातात त्यांच्यासाठी मला धावावेच लागते. ते माझे ब्रीदच आहे. माझ्या भक्तांसाठी मला माझ्या सर्व शक्ती पणाला लावाव्या लागतात. मात्र भक्त तसाच भावार्थी पाहिजे." बाबांचे बोल जमलेले लोक मन लावून ऐकत होते. श्रीबाबांच्या बाबतीत ही घडलेली सर्वप्रकारची प्रकरणे ज्यांनी याची देही याची डोळा पाहिली त्यांना ही बाबांची अग्निवरची सत्ता पाहून काय वाटले असेल? त्यांची बाबांविषयीची जी प्रेमाची भावना होती ती आता तो प्रत्यक्ष ईश्वरच आहे ह्या भावनेने अधिकच दृढ विनम्र झाली असल्यास त्यात नवल ते काय? बाबा परमेश्वर आहेत, त्यांना सर्व कळते ते आपली चिंता वहातात या भावनेने सर्वांची मस्तके श्रीबाबां पुढे विनम्रपणे झुकली होती आणि त्या कर्तुम अकर्तुम शक्तीला धन्यवाद देत होती.

श्रीबाबांची पर्जन्यावरसुद्धा विलक्षण सत्ता होती. एकदा भयंकर वारा सुटला. आकाश मेघांनी भरून गेले. पशुपक्षी घाबरावेत असा झंझावात सुरू झाला. सूर्यास्ताची वेळ. सगळीकडे धावाधाव सुरू झाली. आधीच वारा सुटलेला त्यात मेघांचा गडगडाट सुरू झाला. विजा चमकू लागल्या. भयंकर जोराचा पाऊस पडू लागला. गारा पडू लागल्या. सगळे गावकरी भयंकर घाबरले घरात रहाणे त्यांना धोक्याचे वाटले. शिरडीत अनेक देव देवता पण त्यांचा परमात्मा म्हणजे श्रीबाबा. त्यांच्याशिवाय या संकटातून त्यांचे रक्षण कोण करणार? सगळेजण जीवाच्या आकांताने आर्त हाक मारीत बाबांच्या द्वारकामाईत शिरले. इतकेच नव्हे तर भिकारी, गुरेढोरे ही पण मशिदीकडे धावत आली. जिकडे पहावे तिकडे पाणीच पाणी. सगळे गवत वाहून गेलेले. खळ्यातले सगळे पीक भिजलेले. लोक घाबरले आणि श्रीबाबांना अनन्यभावे शरण गेले. स्वतःच्या जीवापेक्षा परमेश्वराला अनन्यभावे शरण आलेला भावार्थी भक्त आवडतो तो भक्तांच्या हाकेला धाव घेतो त्याप्रमाणे श्रीबाबांनी धाव घेतली ते मशिदीच्या बाहेर आले आणि मेघगर्जनेप्रमाणे त्यांनी आरोळ्या ठोकायला सुरवात केली. ते इतक्या जोराने ओरडत होते आणि पावसाची निर्भत्सना

करीत होते की लोकांनी कानात बोटे घातली. आकाशही त्यांच्या आरोळीने दुमदुमून गेले. लोकांना वाटले की ह्या आरोळीने मशिद डळमळून पडणार — पण तसे झाले नाही. वायू व पर्जन्य श्रीबाबांना घाबरले. दोघेहीजण थांबले. वारा मंद वाहू लागला. पाऊस पूर्ण उगवला. उलट आकाशात चंद्र दिसू लागला. ढग नाहीसे झाले. गडगडाट नाहीसा झाला. हा सगळा प्रकार झाल्यावर पशुपक्षी आपल्या नियोजित जागी निघून गेले. ज्यांनी हा भयंकर प्रकार अनुभवला होता ते शिरडीवासी श्रीबाबांना पुन्हां पुन्हां दुवा देत निघून गेले.

एकदा काका महाजनी आपल्या मित्राला घेऊन श्रीबाबांच्या दर्शनाला आले. २ दिवस राहून परत जायला निघाले व बाबांची आज्ञा घ्यायला आले. त्यावेळी आकाश काळ्या ढगांनी भरुन आले होते. पाऊस केव्हां पडू लागेल याचा भरवसा नव्हता. माधवराव म्हणाले, "देवा, आता त्यांना परवानगी दे ना हा पाऊस त्यांना नक्की भिजवील. होडीतून नदी पार करुन जायचंय ना त्यांना" श्री बाबा हसून म्हणाले, "श्यामा पाऊस त्यांना काही करणार नाही. तेवढे त्याचे सामर्थ्य नाही या द्वारकामाईत बसून मी असत्य भाषण कसे करीन? बरे, काका तू ये आता. पाऊस तुला काहीही करणार नाही. ही उदी घे. काका महाजनी मित्रासहित होडीने नदी पार करुन गाडीत बसले आणि अडून राहिलेला पर्जन्य धो धो पडू लागला. काकांनी प्रवासात पावसाचा काहीच त्रास झाला नाही असे पत्र श्रीबाबांना टाकले ते वाचून श्यामरावांची खात्री पटली की त्यांचा प्रवास होईपर्यंत श्रीबाबांनी पर्जन्याला आपल्या काबूत ठेवले होते. पत्रातील मजकूर श्यामरावांनी प्रांजलपणे बाबांना सांगताच ते फक्त हसले. त्यातच सर्व काही होते.



# माझी समर्थ साई माऊली

—सौ. लिलावती गणेश बर्वे
मेंगदे वाडा, खारीवाव रोड,
बडोदा—३९० ००१

* माऊली म्हटली म्हणजे ती आपल्याला संकटातून मुक्त करण्याकरिता धावून येणारच! त्याच्यात माझी माय माऊली समर्थ आहे! ती काय करू शकणार नाही? पण आपले मन मात्र फार भित्रे असते. उताविळ झालेले असते. अशाच वेळी निष्ठा व सबुरी ठेवायची असते.

असाच प्रसंग माझ्यावर आला होता तो असा —

माझी सून चि. सौ. दिपाली तिच्या माहेरी राजकोटला बाळंतपणाला गेली होती. तिची तारीख एक जानेवारी तो पर्यंत तब्येत चांगली होती. तारीख दोन पासून प्रसूती वेदना सुरू झाल्या. संपूर्ण दोन दिवस त्रास झाल्यामुळे ती अगदी क्षीण झाली. दवाखान्यात नेली असता डॉक्टर म्हणाले तिची तब्येत सिरीयस आहे. अंगात रक्त नाही. ऑपरेशन करून बाळंतपण करावे लागेल. लगेच तिच्या वडिलांनी तार करून आम्हांला बोलावले. मी व माझा मुलगा चि. प्रकाश तारीख तीनला रात्री निघालो. तारीख चारला सकाळी सहा वाजता पोचलो. **आमच्याकडे साईबाबांची ३॥ फुटाची साळूच्या मातीची फारच मोहक मूर्ती** आहे. जाताना बाबांजवळ तेलाचा दिवा लावून व उदी घेऊन आम्ही निघालो. बाबांजवळ अंतःकरण पूर्वक संकट निवारण्यासाठी प्रार्थना केली तेथे गेल्यावर तब्येत पाहिली. बाबांची उदी तिला पाण्यातून एक तासात तीन वेळा दिली व पोटाला चोळण्यास सांगितले व बाबांचा धावा करीत बसले. माझा पूर्ण आत्मविश्वास होता की, माझी साईमाऊली याच्यातून सुखरूप सुटका करील! याप्रमाणे बाबांच्या कृपेने अवघ्या पाच तासात म्हणजे तारीख चार रोजी दुपारी दीड वाजता सुखरूप प्रसूती झाली. ऑपरेशन न करता पुत्ररत्न झाले.

मुलगासुद्धा सात पौंडाचा होता! मग काय विचारता माझा आनंद गगनात मावेना! माझ्या माऊलीची माझ्यावर कृपा आहे याचे समाधान झाले. त्या

नंतर बारपाच दिवसांनी आम्ही बडोद्याला आलो. आल्यावर बाबांना पेढ्याचा प्रसाद दाखवला.

केवढ्या संकटातून त्यांनी वाचवले होते!

नंतर सव्वा महिन्याने माझा मुलगा मुलाला पहाण्यास गेला. तो काय? त्याची हाडे व कातडी शिल्लक होती. अंगावर सुरकुत्या होत्या. हे होण्यास कारण त्याला कोणतेच दूध पचेना. त्याला घेऊन मुलगा बडोद्याला आला. त्याला पाहिल्यावर माझ्या पोटात धस्सच् झाले.

मी त्याला बाबांच्या मांडीवर ठेवला व सांगितले बाबा तुम्हीच त्याचे रक्षण करण्यास समर्थ आहात. तुम्हीच त्याचे डॉक्टर होऊन त्याला चांगला करा! त्याला उदी लावली व पाण्यातून पाजली.

दुसऱ्या दिवशी मुलांच्या निष्णात डॉक्टरांकडे नेला. त्यांनी वजन केले ते अवघे तीन पौंड! त्यांनी औषध दिले त्या औषधात प्रत्येक वेळी उदी घालून औषध पाजायचे असा नियम ठेवला. आता तो चार तारखेला पाच महिन्याचा होईल. आता त्याची तब्येत छानच झाली आहे. वजन तेरा पौंड झाले आहे. त्याला बाबांनीच जीवदान दिले नाहीं का?

त्याचे नाव मी **साईप्रतीक** ठेवले आहे. तो पूर्ण बरा झाल्यावर मी हा अनुभव साईलीला अंकात देईन असे म्हटले होते. त्याप्रमाणे मी माझ्या वेड्या-वाकड्या शब्दात ह्या पहिलाच प्रयत्न करीत आहे. तो बाबा मान्य करून घेतील; असा माझा आत्मविश्वास आहे. अशीच बाबांची सर्व भक्तांवर कृपेची पाखर असावी. एवढी बाबांच्या चरणाजवळ प्रार्थना करते.

माझ्या बाबांना माझे कोटी कोटी प्रणाम असोत.

# लागली साई भक्तांची ओढ

—श्री. रामचंद्र विठोबाजी झिलपे.
गणेश चेम्बर जवळ,
५००, जुनी रामदास पेठ,
नागपूर — ४४०.०१०

**सकल सन्मार्गी लाविणे । कल्याण करणे समस्तांचे ॥**

असे ज्याचे ब्रिदच नव्हे तर, प्रत्यक्ष आचरण आहे असा माझा सद्गुरु साईनाथ. त्यापासून मी, कसा अलिप्त राहू शकेन. ह्याप्रमाणे मला साईबाबांची कशी ओढ लागली त्याचे वर्णन खालील प्रमाणे करीत आहे.

मी, १९७४–७५ ला वर्ध्यास नोकरी निमित्याने गेलो. वर्ध्यातील रामनगर रोडवर श्री साईबाबांचे मंदिर आहे. त्यावेळी मंदिराचे बांधकाम अपूर्ण होते. आणि मंदिराचा गाभारा रस्त्यावरून दिसत नव्हता, मी त्या रस्त्याने जात असतांना हे मंदिर मला दिसले. मंदिरात जाण्याची मला इच्छा झाली. नकळतच मी मंदिरात गेलो, नमस्कार करणार तोच मंदिरातील श्री साईबाबांची नयन मनोहर मूर्ति मला दिसली. मला त्या वेळी श्री साईबाबा कोण, व कोणाचे दैवत आहे याची मुळीच कल्पना नव्हती. मंदिरात फकीर किंवा साधूची मूर्ति असलेले हे मंदिर मी आज पहिल्यांदाच बघत होतो. याचे मला आश्चर्य वाटले. आधी कोणत्याही साधू संतावर माझा विश्वास नव्हता. मी श्री साईबाबांच्या मूर्तीकडे एकसारखे पाहून ओळखण्याचा खूप प्रयत्न केला. पण काहीच उमजेना. नमस्कार करायला मन तयार होत नव्हते. २–३ मिनीटे विचार केला की, आपण मंदिरात आलो आहोत; तर सर्व साधारणपणे नमस्कार करावा व निघावे. नमस्कार न करताच जाणे योग्य नाही. म्हणून नमस्कार केला व मागे फिरलो. परत जातांना माझे मागे कुणी तरी येत असल्याचा भास झाला. बरेच अंतर गेल्यावरही हा भास होत होता, पण माझे मागे कुणीच नव्हते.

वर्ध्यावरून नागपूरला आलो. एक, दोन दिवस असेच गेले. फारसे मन कुठे रमत नव्हते. वाचावे म्हणून वर्तमानपत्रे, व इतर पुस्तके चाळायला लागलो. त्यात "मुलांचे साईबाबा" हे पुस्तक पहिल्यांदाच माझेकडे आले. लहान मुलांचे

पुस्तक गमतीदार असते म्हणून मी वाचावयास लागलो. सुरुवातीला एक, दोन पाने वाचली, मन काही रमेना, तरी त्यास वाचण्याचा प्रयत्न केला पुढे दोन, तीन पाने वाचल्यावर मात्र मन त्याकडे आकर्षिले गेले, त्यात बाबांनी केलेल्या चमत्कारांचे कुतूहल वाटले, व पुस्तक वाचण्यात गढून गेलो. संपूर्ण पुस्तक वाचल्यानंतरच मी ते पुस्तक ठेवले. श्री बाबांच्या चमत्कारामुळे व अचाट दैवी शक्तीमुळे मी पार भारावून गेलो. मोहिनी पडल्यासारखे झाले. व बाबां-बद्दल अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करु लागलो. "मुलांचे साईबाबा" या लहान पुस्तकाने मला श्री बाबांची ओढ लावली, नव्हे, श्री बाबांनीच आपल्याकडे मला आकर्षित केले. वर्षाला न कळत केलेल्या नमस्काराचे फळ मिळाले. त्यानंतर मी, तीनदा शिर्डीस जाऊन आलो. मला व माझ्या कुटुंबियांना साईबाबांनी अनेकदा अनेक संकटातून मुक्त केले आहे. साईबाबांच्या कृपेनेच माझ्या कुटुंबियांतील सर्वच सुखी व समाधानी आहेत.

म्हणूनच बाबांनी आपल्या वचनात सांगितले आहे :-

**"माझ्या समाधीची पायरी जो चढेल । दुःख हे हरेल सर्व त्याचे ॥**

* * *

# बाबा आणि मी

**—सौ. नीला उपाध्ये**
२४—ए महाराष्ट्र सोसायटी,
एलिस ब्रिज, अहमदाबाद.

* सत्तावीस वर्षापूर्वीची गोष्ट. नगरला माहेरी सर्वच बहिणी व भाऊ जमलो होतो. वडिलांच्याकडे सर्वजण शिर्डीला निघाले. मला कोणी न्यायलाच तयार नाही. कारण तीन महिन्याची माझी लहान मुलगी. तिथं कुठं व्यवस्था होणार, मी म्हटल मी येणार. अन् निघाले. उन्हाळ्याचे दिवस सुटटीमुळे गाडीला गर्दी पण मला ऐनवेळीही बसायला जागा मिळाली. मुलीने हूं का चूं केले नाही. कुठेही त्रास दिला नाही. शिर्डीला देवळाच्या वरच्या बाजूला आम्ही उतरलो होतो. त्यादिवशी दिवे गेले किंवा काय असावे, ते माहित नाही. पण मोठे पेट्रोमॅक्सचे दिवे, दोन बत्त्या आणून ठेवल्या. त्याभोवती येणारे किडे त्रास देऊ लागले म्हणून एक सतरंजी टाकली व मुलीला घेऊन झोपवू लागले. सर्वजण

दर्शनाच्या ओढीने आधीच निघून गेले होते. मी म्हटले छोटी नीला झोपली की आपण पोटभर दर्शन घेऊ. आणि सहज माझा क्षणभर डोळा लागला. इतक्यात पांढरे स्वच्छ गुडघ्यापर्यंत नेसलेले, डोक्याला फडके पण पांढरे विलक्षण तेजस्वी असा म्हातारा हलकेच माझ्या पायापाशी आला कोण. कोण म्हणून जागी झाले. कोणीच नव्हते. मी मुलीला झोपवून उठले व वरच्या गॅलरीतून बाबांचे दर्शन घेतले. -- अरे! बाबाच होते ते बाबाच, आपल्याला समजले नाही पाय पकडले असते झोपेत पण एकतर माझ्या मनाच्या तीव्र इच्छेला – मला सर्वांआधी खरे दर्शन दिले. दुसरे, मनातली शंका बाबांचं वास्तव्य खरच असेल का? – प्रत्यक्ष बाबाच दिसले. – ते साईबाबा मी कधीही विसरणार नाही. हे लिहितांना पण तो प्रसंग डोळ्यासमोर उभा रहातो.

उदी :– त्यावेळी आणलेली उदी एका बाटलीत भरून कपाटात ठेऊन दिली. एकतर एका बाजूला राहिली म्हणजे कोणी हात लावणार नाही. पण पुढे काय झाले मी विसरून गेले. आणि एके दिवशी दुपारी काहीतरी हवे होते म्हणून कपाट उघडले. सर्व बाटल्या सारख्या होत्या. एक बाटली उघडली. झाकण उघडल्याबरोबर तर धुराची वलय वलय वर पर्यंत गोल आकारात. मला वाटल काय आहे. एकदा झाकण उघडल्यामुळे असेल. बाटली हलवली तर वलय चालूच. म्हणून त्या वलयात मी हात घातला. गरम लागली. अरे बाबांची उदी!! एकदम आठवण झाली. त्याबरोबर ती वलय पूर्ववत बाटलीत बसली. मला आठवण दिली. लगेच ती बाटली मी देवात ठेवली आहे. प्रसंगी उपयोग करते.

शिर्डीहून निघतांना शेवटी दर्शनाला गेले. तेव्हां बाबा, माझे पाय फार दुखतात सहन होत नाही, असे सांगितले व मी विसरले. पुढे पुण्याला आल्यावर आठ दिवसांनी लक्षात आले. अरे, आपले पाय कसे राहिले? बाबांनी बरे केले ...नंतर मी पुण्याला आल्यावर लहान मुलीला सांभाळून अपुरे राहिलेले चरित्र वाचले. बाळंतपणात सव्वा महिन्यात सुरू केले वाचायला म्हणून मोठी बहिण रागवायची पवित्र ग्रंथ अशावेळी वाचायचे नसतात पण मी पुरा केला वाचून. सुंदर फोटो आणला आणि घरी आले. तो पत्र आले होते. ह्यांना मोठ्या पगाराची नोकरी मिळाली. तेव्हांपासून प्रगतीला सुरूवात झाली.

बाबांची सेवा सरळ साधी आहे. अनुभव मात्र क्षणोक्षणी आहेत, असे तुम्हांला कृपा करणारे कोणी सापडणार नाही –

☆

# कृतांताच्या दाढेतून, काढीन मी निजभक्तां ओढून।

—श्री. प्रविण मधुसूदन वैवुडे
झेंडा बजार, शिंपी आळी,
वसई ४०१ २०१, जि. ठाणे

* मी वसईला रहातो, आणि कामाला ठाण्याला जातो. रोज जाता–येताना ठराविक गाडी, ठराविक बस ठरलेली असते. तो दिवस ३१ डिसेंबर ८२ चा होता. वार शुक्रवार असून लोकल हॉलिडे होता. परंतु आमच्या साहेबांनी कार्या-लयीन आदेश काढून कामावर बोलावले होते. माझी नवीनच नोकरी म्हणून मी कामावर गेलो. का कोण जाणे! परंतु तो दिवस मला काही विचित्रच वाटत होता. माझे कामात लक्ष लागत नव्हते. अचानक माझे पोट दुखायला लागले. मी अतिशय असह्य झाल्याने साहेबांना सांगून घरी आलो.

घरी आल्यावर देखील फारसा फरक तब्येतीत नव्हताच. नंतर रात्री ७॥ ते ८ वा. वसईच्या पापडी जवळ बसचा अपघात झाल्याची बातमी कानी आली म्हणून मी सरकारी दवाखान्यात जखमींना पहाण्यासाठी गेलो. ह्या अपघातामध्ये जोरात बस उलटी झाली होती. आणि जवळ जवळ ३५ माणसे जखमी होऊन ५ अत्यवस्थ अवस्थेत मुंबईला रवाना केली, आणि ज्या बसचा अपघात झाला, त्याच बसने मी रोज रात्री घरी येतो. माझ्या अंगावर शहारे उभे राहिले, आणि मला माझ्या बाबांची आठवण झाली. जर मी त्या अपघातामध्ये सापडलो असतो तर .....! त्यामुळे हॉस्पिटलमध्ये काही दिवस तरी काढावे लागले असते. तसेच अपघाताने काही खर्च करावा लागला असताच, आणि कामावर रजा लागल्याने पगार मिळाला नसता. या सर्व गोष्टींची जाणीव बाबांना होतीच. म्हणून त्यांना आपल्या मुलाला लवकर घरी जाण्याची बुद्धि दिली. मला हे सर्व कळल्यावर बाबांच्या वचनाची आठवण झाली, "कृतांताच्या दाढेतून! काढीन मी निजभक्ता ओढून"!

अशा साईमाऊलीला माझे शतशः प्रणाम।

— ❖ —

# नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य।
# नित्य घ्या प्रचीत अनुभव।

श्री. के. के. थिटे
बी. एस्सी,. बी. एड्. एल. एल. एम्.
ॲडव्होकेट,
२५८, कसबा पेठ, पुणे ११.

* पुणे हे विद्येचे माहेर घर तसेच महाराष्ट्रातील एक उच्च सांस्कृतिक केंद्र मानले जाते. तसेच महाराष्ट्रातील अनेक मोठ्या बार असोसिएशन पैकी पुणे ही एक आहे. कारण एकट्या पुण्यात १५०० वकील वकीली करतात व त्यातूनच आज पर्यंत अनेक केंद्रीय मंत्री व महाराष्ट्राचे मंत्री म्हणून नावाजले गेले आहेत.

मी त्या मानाने ज्युनियर वकील, परंतु ज्या वकीलांच्या सोसायटीची दर-वर्षाची आर्थिक उलाढाल पन्नास लाखा पर्यंत जास्त आहे, अशा सोसायटीची मला सन १९८१ साला अखेर माहिती नसतानाही मला शेअर्स (चार शेअर्स) दुसऱ्या वकीलाचे बदलून मिळाले व मी सोसायटीचा नगण्य सभासद झालो. परंतु त्या नंतर सोसायटीच्या कारभारात मी लक्ष घालावे म्हणून अनेक सिनि-यर तसेच ज्युनियर वकीलांनी मला सोसायटीच्या त्रैवार्षिक निवडणुकीस उभे राहण्याचा आग्रह केल्यामुळे मी निवडणुकीस उभा राहून भरघोस मतांनी सभा-सद म्हणून निवडून आलो अर्थात माझ्या ध्यानी मनी नसतानाही मला वरील सभासदांनी पुन्हा लगेच मॅनेजिंग कमिटीच्या निवडणुकीस उभे राहण्याचा आग्रह केला व डिसेंबर १९८२ मध्ये पदाधीकाऱ्यांची निवडणुक झाली. मी त्या दिवशी सकाळी दर रोजच्या नित्यनियमा प्रमाणे शिवाजीनगर पुणे येथील सद्गुरु श्री साईबाबा मंदिरात जाऊन बाबांचे चरणी प्रार्थना केली की,, "**बाबा मी या निवडणुकीत निवडून येऊ दे व माझ्यावर येणाऱ्या जबाबदाऱ्या व वकील वर्गाचा विश्वास संपादन करणेची कार्यक्षमता माझ्या अंगी येणेसाठी आशिर्वाद द्या. आणि काय आश्चर्य पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीत सर्वात तरुण असूनही जॉईंट सेक्रेटरी म्हणून माझी श्री साईकृपेने निवड झाली,** व श्री साईकृपेनेच आज मी हे जबाबदारीचे काम यथा शक्ती पार पाडीत आहे. श्री साईबाबांवर श्रद्धा ठेवून व सबुरी धरून श्री साईभक्ती केल्यास साईभक्तीचे निश्चित फळ मिळाल्या शिवाय रहात नाही. हे मी अनेकदा अनुभवीत आहे.

श्री. साईबाबा माझ्या सारखेच आपल्या इतर भक्तांना साईभक्ती करणेची प्रेरणा देवोत व माझ्या सारखाच कृपा वर्षाव साई भक्तांवर करोत हीच श्री साई चरणी प्रार्थना.

*********************

# आगळा वेगळा माझा साई

*********************

–श्री. सुरेश दत्तात्रय कुलकर्णी
द्वारा द. ना. सिरूर बालकाश्रम,
४०, प्रार्थना समाज रस्ता
विलेपार्ले (पूर्व), मुंबई–४०० ०५७.

साई बाबांचा मी भक्त कसा झालो याचा सविस्तर उल्लेख जून १९८३ च्या "साईलीला" च्या अंकात "चमत्काराशिवाय नमस्कार नाही" या माझ्या लेखात झालेला आहेच. भक्त म्हटल्यावर "साई चरित्र" वाचावे आणि माझ्या लाडक्या साईबद्दल संपूर्ण माहिती मिळवावी अशी स्वाभाविक इच्छा माझ्या मनात निर्माण झाली आणि म्हणून मी माझे मित्र सुप्रसिद्ध सिनेपार्श्वगायक श्री. जयवंत कुलकर्णी यांचेकडून "साई–चरित्र" मागविले. ७४४ पानांचे ते चरित्र पाहता आणि कामाचा मागील व्याप विचारात घेता लक्षात आले की, संपूर्ण चरित्र वाचून लगेच होईल असे नाही आणि म्हणून मी साईचरित्र चाळावयास घेतले आणि चाळता चाळता श्री सद्‌गुरु साईबाबांची ११ वचने माझ्या वाचण्यात आली ती वाचली आणि त्याच क्षणी मनाशी विचार आला की किती समजण्यास सोपी, आचरणात आणण्यास साधी आणि तरीही महत्त्वपूर्ण अशी ही वचने आहेत तेव्हा मी संपूर्ण साईचरित्र वाचले काय आणि अकरा वचनांचे आचरण केले काय दोन्ही सारखेच.

अनेक पोथ्या, पुराणे, कहाण्या वगैरे माझ्या वाचण्यात आल्या आहेत. परंतु प्रत्येकात काही ना काही क्रूरता आढळून आली आहे. उदा. सत्यनारायणाची पोथी वाचली तर त्यात केवळ एकदा सत्यनारायणाचा प्रसाद घ्यायचे टाळले तर त्या व्यापाऱ्यावर चोरीचा आळ येऊन त्यास कैदखान्यात खितपत पडावे लागले. तर एकदा सत्यनारायणाची पूजा करण्याचे विस्मरण झाले तर त्याच व्यापाऱ्याला त्याच्या नावेसह बुडवून जन्माची अद्दल घडविल्याचे दिसते. नंतर जेव्हा श्री सत्यनारायणाची यथासांग पूजा केली जाते तेव्हां मात्र त्या व्यापाऱ्याला त्याच्या नावेसह समुद्रातून वर काढल्याची अद्‌भूत किमया घडल्याचे दिसून येते. असे अनेक अद्‌भूत चमत्कार वेगवेगळ्या देवतांनी आपल्या भक्तांना त्यांच्याकडून भक्ती करताना चूक झाल्यास दाखविले आहेत.

प्रत्येक देवतांनी आपल्या भक्तांना आपली भक्ती, आपली पूजा अशी कशी करावी याचा यथासांग उहापोह केलेला दिसून येतो. भक्ती करताना थोडीशीही चूक झाली तरी देखील मोठ्या आपत्तीतून, गरीबीतून, हाल अपेष्टातून भक्तांना जावे लागल्याचे दिसून येते म्हणजेच प्रत्येक देवतांनी माझी पूजा अशी करा तशी करा नाहीतर संकटांना सामोरे व्हा असाच जणू काही दंडक आपल्या भक्तांना घालून दिलेला आहे असे दिसून येते. माझ्या मते एखाद्या देवतेच्या कथा, पोथ्या, पुराणे यात सांगितल्याप्रमाणे यथासांग पूजा करणे म्हणजे ही झाली भितीपोटी भक्ती. भितीपोटी केलेली भक्ती ही खरी भक्ती नव्हे.

श्री साईबाबांच्या अकरा वचनात कोठेही अहंभाव दिसून येत नाही किंवा त्या वचनांचे पालन करणे भक्तांना शक्य झाले नाही तर त्याबद्दल कोणताही शाप श्रीसाईंनी आपल्या वचनात दिलेला नाही उलट "करेगा उसका भला न करेगा उसका भी भला" असा उदात्त विचार साईबाबांचे ठायी दिसला तो अन्यत्र कुठेच मला दिसला नाही.

अनेक देवतांच्या नैवेद्यासाठी दूध, साखर, मध, गुळ, खिरी, पंचामृते, पंचपक्वाने, सोळा सोळा प्रकारच्या भाज्या, कोशिंबीरी करण्यास शास्त्राने सांगितले आहेत. देवतांच्या प्रसन्नतेसाठी पारायणे, ब्राम्हणांना दक्षणा, सुवासिनींना, कुमारीकांना, मुंजा मुलास जेवण, वस्त्रदान, इत्यादि सर्वसाधारणपणे गरीबाच्या खिशास न परवडणारे प्रकार सांगितले आहेत पण याच्या उलट माझ्या साईला नैवेद्य कोणता आवडतो तर झुणका आणि भाकर! म्हणजेच सर्वसामान्याचे जे रोजचे अन्न तेच माझ्या साईला आवडते. देव म्हणून वेगळे असे काही नाही. फक्त तो नैवेद्य श्रद्धेने अर्पण करावा हाच एकमात्र हेतू.

साईचे आणखी एक वेगळेपण असे की ते सर्व धर्मीयांना आपल्याच जाती–जमातीचे प्रतीक आहेत असे वाटतात. जसे ते हिंदूना आपले वाटतात तसेच मुस्लिम धर्मीयांना देखील! हिंदू, मुस्लीम, खिस्ती, गुजराथी, पारसी, सिंधी, पंजाबी या सर्व बांधवांना ते आपलेच आहेत असे वाटतात. मला ही सुद्धा साईचीच लीला आहे असे वाटते की त्यांनीच आपले वर्तन असे ठेवले की सर्वधर्मीयांना वाटावे की आपले धर्म, आपली शरीरे वेगवेगळी असली तरी आपला आत्मा एकच आहे. आपली मंदिरे वेगवेगळी असली तरी देव एकच आहे.

भारतातील सर्व धर्मीयांना धर्म आणि जाती यांच्या अभेद्य भिंती ओलांडून एकत्र जमावयास लावण्याची आणि त्या सर्वांचे श्रद्धास्थान होण्याची किमया फक्त साईनाच नीटपणे करता आलेली आहे असे वाटते.

श्रीसाईनी केलेला उपदेशही मोठा अर्थपूर्ण आहे. जणू काही त्यांनी आपल्या उपदेशातून सर्व भारतवर्षीयांना हेच सांगितले आहे की धर्म आणि जातीभेद विसरून माझ्या ठायी श्रद्धा ठेवा आणि सर्वांनी एकमेकाशी सबूरीने वागा तेच हिताचे.

वरील सर्व गोष्टीमुळे मला वाटते की, देवासारखा देव आणि माणसासारखा माणूस असा आहे माझा आगळा वेगळा साई. *

▲▲▲▲▲▲

## गुरुपौर्णीमा विशेषांकाबद्दल

श्री. संपादक, क. हि. काकरेसाहेब,

यांस सा. न. वि. वि. क्षेम, जुलाई १९८३ चा गुरु पौर्णिमा अंक वाचला. मनाला फार आनंद झाला.

संपादकीय पासून सर्व लेख, कविता, योग्य असून हे मासिक भारतात सर्वात श्रेष्ठ आहे. असे म्हणण्यात काही चूक नाही, साई भक्तांना अभिमान आहे, की श्री साईबाबांवर प्रकाशित होणाऱ्या नियत कालिकांची सूची व पत्ते प्रकाशित करून फार मोठे उपकार केले आहेत.

श्री साईलीला मासिक मी रोज वाचतो. वाचत वाचतच मराठी शिकलो, माझी मातृभाषा कानडी आहे. माझी शिक्षा काशी क्षेत्री झाली म्हणून हिंदीच माझी मातृभाषा झाली आहे.

हे सर्व बाबा साईंची कृपा. स. धन्यवाद!

आपला

**प्रा. गुंडेराव पटवारी, "साहित्य रत्न**

(बिदर) कर्नाटक, ५८५४०१

# साईबाबा आणि आपण

—कुमार बिपिन रमेश चव्हाण
साई निकेतन, गुजरलेन कॉर्नर,
मु. पो. ता. नवापूर, जि. धुळे,
नवापूर पिन ४२५ ४१८

◦ सद्‌गुरु साईबाबा सतत आपल्याजवळ असतात आणि ते पावलो पावली आपल्याला सांभाळीतच असतात.

◦ सद्‌गुरु साईबाबा विश्वाचा नियंता आहे. आपणावर होणारा न्याय अन्याय तोच ठरवित असतो. अन्यायाने वागणाऱ्यास कधीतरी दुःखभोगाचा दंड देतो आणि न्यायाने वागणाऱ्यास एक दिवस यश देतोच म्हणून आपण न्यायाने वागावे; सत्य सोडू नये.

◦ साईबाबा हे तारक आहेत मारक नव्हेत. मोठमोठ्या संकटातून दुःखातून ते आपल्याला तारून नेतात.

◦ साईबाबा म्हणत, "तुम्ही माझ्याकडे पहा म्हणजे मी ही तुमच्याकडे पाहिन याचा अर्थ असा की, आपण मन व बुद्धि देवाला अर्पण करू तेव्हांच देव आपल्याकडे पाहिल."

◦ साईबाबा म्हणत, "जो मनुष्य सत्यवचनी राहील त्याच्या पाठीमागे मी सदैव राहातो मला सत्य अधिक प्रिय आहे." म्हणून आपण सत्याचाच मार्ग धरा.

◦ साईबाबांनी आपल्या वचनापैकी एका वचनात सांगितले आहे की, "शिरडीस ज्याचे लागतील पाय टळती अपाय सर्व त्याचे" म्हणूनच साईभक्तांनी अपाय दूर करण्यासाठी एकदा तरी शिरडीला जावे.

◦ तुम्ही कोणत्याही क्षेत्रात अगर व्यवसायात असा मात्र श्रद्धा आणि सबुरी बाळगली तर तुम्हांस शंभर टक्के यश मिळालेच म्हणून समजा त्यासाठी आपण श्रद्धा सबुरीची कास धरा.

० साईबाबांनी आपल्या भक्तांना सांगितले आहे, "तुम्ही नुसते साई–साई असे नित्य स्मरा व माझी भक्ती करा म्हणजे तुम्हांला कळिकाळाचे भय कदापि राहाणार नाही आणि सुख आपणहून पायाशी येईल. निदान सुखासाठी तरी साई–साई नित्य स्मरा व बाबांची भक्ती करा.

० साईबाबांनी आपल्या भक्तांना सांगितले आहे "तुम्ही काहीही मागा मी ते पुरविन मात्र मागणे मत्याम धरून असले म्हणजे वाटेल ती किंमत देऊन पूर्ण करीन.

० साईबाबांनी सर्वांना उपदेश करताना म्हटले आहे "या जगात कोणी कोणाचे नाही. बायको, पुत्र, माता, पिता, बहीण, भाऊ, मामा, भाचे, काका, काकू इत्यादि सारा मायेचा खेळ आहे. आपण या जगात नग्नावस्थेत आलो व शेवटी एक दिवस या जगातून जाणार आहोत. म्हणून चांगले कार्य करून पुण्य मिळवा.

*

# परम साईभक्त श्री नानासाहेब चांदोरकर

साईबाबांचे अतिनिकटचे स्नेही व भक्त म्हणून श्री. नानासाहेब चांदोरकर यांचे नाव घेतले जाते. त्यांचे संपूर्ण नाव श्री. नारायण गोविंद चांदोरकर. त्यांचा जन्म ठाणे येथे शके १७८२ इ. स. १८६० च्या पौष महिन्यातील मकरसंक्रातीच्या दिवशी झाला. त्यांचे मराठी शिक्षण कल्याण येथे व इंग्रजी शिक्षण मुंबईस एल्फिस्टन विद्यालयात व त्या पुढचे एल्फिस्टन महाविद्यालयात झाले, ते मुंबई विद्यापीठाचे बी. ए. पदवीधर. संस्कृत हा त्यांचा अतिशय आवडीचा विषय.

बी. ए. नंतर त्यांची नेमणूक प्रथम संगमनेर येथे मामलतदार कचेरीत कारकुनाचे जागेवर झाली. नंतर ते काही दिवसांनी नगर जिल्ह्यातील कोपरगावी अव्वल कारकून म्हणून नेमले गेले. १८९२ साली नगर येथे ते कलेक्टरसाहेबांचे चिटणीस झाले. पुढे १८९३ साली त्यांना पुणे जिल्ह्यात घोडनदी तालुक्याचे मामलतदार नेमण्यात आले. नंतर पुन्हा १८९४ ते १९०१ पर्यंत नगर जिल्ह्याच्या कलेक्टरसाहेबांचे चिटणीस नेमण्यात आले. १९०२ मध्ये

त्यांना जामनेर तालुक्याचे मामलतदार नेमले गेले. नंतर त्यांची बदली अनुक्रमे नंदुरबार, पंढरपूर इ. ठिकाणी मामलतदार म्हणून करण्यात आली होती. १९०८ साली ते पुणे येथे डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर झाले व १९०९ साली त्यांची बदली ठाणे येथे डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर म्हणून झाली व १९१५ साली ते डिस्ट्रिक्ट कलेक्टर या पदावरून सेवानिवृत्त झाले.

श्री. नानासाहेब यांचा विवाह १८७८ साली कल्याण येथे झाला. अलिबाग जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील पळसपे गावातील प्रसिद्ध श्रीमान सावकार व जमीनदार ओझे घराण्यातील श्री. विनायक सदाशिव उर्फ काकासाहेब ओझे यांची कन्या बायजाबाई यांच्याशी झाला. त्यांचे सासरचे नांव राधाबाई. नानांना बरीच अपत्ये झाली.

नानासाहेब कोपरगावी अव्वल कारकून असताना त्यांचा लहान मुलगा आजारी पडला, पण त्या वेळी तिथे रुग्णालय नसल्याने व वेळेवर औषध-पाण्याची सोय न झाल्याने तो मरण पावला. औषधपाण्यावाचून येथल्या लोकांची बरीच गैरसोय होत असते, म्हणून की काय, नानांनी १८९० साली आपले स्वतःचे पैसे खर्च करून एक खाजगी रुग्णालय कोपरगावी काढले व ते १८ वर्षे चालवून पुढे लोकल बोर्डाच्या ताब्यात दिले.

अहमदनगरच्या कलेक्टरसाहेबांचे चिटणीस श्री. चिदंबरराव गाडगीळ यांची बदली मामलतदाराच्या जागी झाली. नाना चिटणीसपदावर असताना कोपरगाव तालुक्याची जमाबंदी त्यांच्याकडे होती. तेव्हा शिरडीचे अप्पा कुलकर्णी हे बाबांची आज्ञा घेऊन जमावबंदीसाठी नगरला जायला निघाले, तेव्हां श्रीबाबांनी अप्पाला निरोप दिला की 'नानांना मी बोलाविले आहे, सांग.' अप्पानी नगरास गेल्यावर बाबांचा निरोप नानांना सांगितला, पण येत नाही असा जबाब दिला, असे तीन वेळा झाले. शेवटी नानांनी बाबांच्या भेटीस येण्याचे कबूल केले.

पुष्कळ दिवस रद्दी म्हणून गाठोड्यात बांधून ठेवलेला व मानेवर थोडा फाटलेला अलपाकाचा कोट घालून ते एके दिवशी बाबांकडे यावयास निघाले. पण आपण एखाद्या संताकडे जात आहोत, की अप्पांच्या नादी लागून एखाद्या भणंग फकिराकडे जात आहोत; व संताकडे जात असू तर त्यांच्या पुढे ठेवण्या-साठी आपल्याजवळ काहीच नाही, अशा प्रकारचे विचार त्यांच्या मनात डोकावू

लागले. पुढे शिरडी जवळ जात असता सहज म्हणून त्यांचे हात खिशात गेले तो काय आश्चर्य! एक पुडी त्यांना सापडली. ती उघडून पाहाता तीत तीन–चार बदामबिया व तीन–चार खडीसाखरेचे खडे त्यांना आढळून आले. त्यांना आनंद झाला. ते बाबांकडे गेले व बाबांना साष्टांग नमस्कार घालून त्यांच्यापुढे ती पुडी ठेवून ते बाबांजवळ बसले व मला का बोलावले, म्हणून त्यांनी बाबांना विचारले,

"अरे, जगात एकच का नाना आहे व मी तुलाच का बोलावले, याच काही कारण असेलच, की नाही. तुझी व माझी चार जन्मांची संगती आहे. तुला माहित नाही, पण मला माहित आहे."

नानांचा या गोष्टीवर विश्वास बसेना. नानांच्या आग्रहावरून बाबांनी त्या पुडीतील बदामाचा तुकडा व खडीसाखरेचा खडा ठेवून बाकीची पुडी नानांना परत दिली व आता असेच येत जा, असे नानांना परत जाताना सांगितले. पुढे नगरला प्लेग सुरू झाला, तेव्हां बाबांना विचारूनच नानांनी टोचून घेतले

एकदा नानासाहेब हरिश्चंद्राचे डोंगरावर देवीच्या दर्शनासाठी म्हणून गेले, पण डोंगराच्या मध्यावर आल्यावर त्यांना वरती चढवेना व खालीही उतरवेना, यातच तहानेने ते व्याकूळ झाले. ते एका दगडावर थकलेल्या अवस्थेत बसले. एवढ्यात एक मोळीविक्या आला. त्याच्याकडे पाण्याची त्यांनी विचारपूस केली, तेव्हां तू जिथे बसला आहेस तिथे पाणी आहे, असे सांगितले व खरोखरच नाना जिथे बसले होते, तिथे पाणी मिळाले.

काही दिवसांनी नाना बाबांच्या दर्शनासाठी शिरडीस गेले तेव्हां बाबांनी त्यांना या गोष्टीची आठवण करून दिली. तेव्हां नानांना बाबांचे खूप कौतुक वाटले व त्यांची श्रद्धा दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊ लागली.

पुढे नानांनी शिरडीस एक छोटेसे घर बांधले व ते तिथे रहावयास जात. त्यांनी ठिकठिकाणी तंबू बांधून बाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांची सोय प्रथम केली. आपल्या पदरच्या खर्चाने त्यांनी एक खाणावळ पण काढली. बाबा निरनिराळ्या लोकांकडून, मारवाड्यांकडून रकमा आणून आपल्या भक्तांची योग्य ती संभावना करीत असत व नानासाहेब शिरडीस आले, म्हणजे त्यांना त्या रकमांची भरपाई करण्यास सांगत असत व नाना पण न कुरकुरता सारे पैसे चुकते करीत व मारवाड्यांच्या पोहोच पावत्या घेऊन त्या बाबांच्या चरणी अर्पण करीत. या व्यवहारानिमित्त बाबांनी नानासाहेबांना

अनेक प्रकारचा उपदेश करून अनेक अनुभव दिलेले आहेत. नानांनी बाबांच्याकरिता शिरडी कार्यासाठी अत्युत्कृष्ट भावनेने व अमर्याद प्रेमाने कमीत कमी दहा हजार रुपये खर्च केले. नानांनी बाबांची फार मोठी हयातभर सेवा केली. ता. २१-८-१९२१ रोजी श्रावण कृ. ४ शके १८४३ रोजी नानासाहेब कल्याण येथे आपल्या स्वतःच्या घरी श्रीसाईचरणी विलीन झाले.

श्रीसाईबाबा नानासाहेबांच्या जवळ स्पष्ट व मनमुराद बोलत असत. बाबांना प्रख्यातीस आणण्यास व त्यांची सुकीर्ती वाढविण्यास नानासाहेबच कारणीभूत आहेत, असे म्हणावे लागल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही. बाबा मूळचेच अमोल रत्न; परंतु हे अमोल रत्न शिरडीसारख्या लहानग्या गावात पडले, त्यामुळे त्यावेळी त्यांची प्रसिद्धि जेवढी व्हावयास पाहिजे होती तेवढी झाली नव्हती; पण नानासाहेबांच्यामुळे अनेक पदवीधर व बडी बडी मंडळी शिर्डीस फार मोठ्या प्रमाणावर येऊ लागली व बाबांची उज्वल अशी कीर्ती सगळीकडे पसरली. बाबांनी नानांना परमार्थाचे अनेक धडे दिले. अनुभव दिले, दृष्टांत पण दिले.

एकदा श्रीबाबांनी नानांना 'तद्विद्धि प्रणिपातेन' या गीतेतील श्लोकाचे स्वतः विवरण करून सांगितले, ती घटना अशी :

एकदा नाना बाबांचे पादसंवाहन करीत असताना तोंडाने काहीतरी गुणगुणत असल्याचे पाहून श्रीबाबांनी त्यांना विचारले,

"अरे नाना, काय गुणगुणतो आहेस, जरा मोठ्याने तरी म्हण, आम्हांला पण ऐकू दे."

यावर नाना अदबीने म्हणाले,

"काही नाही, बाबा सहज गीतेचा पाठ म्हणत होतो."

"असे का? छान!" श्रीबाबा उद्गारले व जो श्लोक नाना गुणगुणत होते. तो मोठ्याने म्हणण्यास व त्याचा अर्थ विशद करण्यास त्यांना सांगितले. तेव्हां बाबांच्या आज्ञेनुसार नानांनी पुढील गीताश्लोक मोठ्याने म्हणून दाखविला तो असा —

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्व दर्शिनः ॥

(अ. ४ श्लोक ३४)

हा मूळ श्लोक म्हणून झाल्यावर नानांनी आपल्या परीनें अर्थ सांगण्यास सुरुवात केली. ते म्हणाले,

"जो कुणी गुरुपदी प्रणिपात करून, स्वतःचे जीवित गुरुसेवेस वाहातो व आदरानें प्रश्न पुसून स्वतःचे समाधान करून घेतो, त्याला ज्ञानीजन ज्ञानोपदेश करतात" असे सांगून नाना पुढे म्हणाले, बाबा, माझ्या माहितीप्रमाणे गीतेच्या सर्व भाष्यकारांनी गुरुसेवा, गुरुप्रणति ही ज्ञानसंवित्तिदायक असल्याचे स्पष्टपणे सांगून जो कुणी या मार्गाने जाईल, त्याला तत्त्वदर्शी ज्ञानी ज्ञानाचा रस्ता जरूर दाखवतील, असे स्पष्टपणे आश्वासन दिले आहे.

श्री बाबांनी हे स्पष्टीकरण ऐकून घेतले व म्हणाले,

"पहिल्या दोन चरणांचा अर्थ मला मान्य आहे; पण उत्तर श्लोकाचा जो अर्थ तू सांगितलास, तो माझ्या मते बरोबर नाही. 'उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिन स्वत्त्वदर्शिनः' या चरणात 'ज्ञान' शब्दाऐवजी 'अज्ञान' हा शब्द घेतला पाहिजे. वास्तविक हा चरणच उपदेक्ष्यन्ति तेऽज्ञानं ज्ञानि स्तत्व दर्शिनः असा असावयास हवा होता, अरे, असे पहा, 'ज्ञान' हा काय बोलाचा विषय आहे, म्हणून त्याचा उपदेश करता येईल? 'ज्ञा' हे शब्दातील असून 'अज्ञान' मात्र उपदेशाचा विषय होऊ शकते. भगवंतांनी गीतेत स्पष्टपणे सांगून ठेवले आहे की ज्याप्रमाणे गर्भ वारेने वेष्टिलेला असतो किंवा आरशावर मळ, धूळ साचलेली असते, तसेच ज्ञान हे अज्ञानाने वेष्टिलेले असते. अज्ञान दूर केले गेले, की ज्ञान स्वयंप्रकाशू लागेल. लक्षात ठेव, की 'ज्ञान' ही जाणावयाची वस्तू नाही, तसेच ती उपदेशाची पण नाही. फक्त प्रणिपात, परिप्रश्न सेवा ह्या गुरुकृपेच्या साधनांच्या माध्यमाने याचा उदय प्रत्येकाच्या अंतःकरणात होऊ शकेल."

आपल्या ह्या विधानाच्या स्पष्टीकरणार्थ रज्जू—सर्प, सुवर्ण-काट (सुवर्ण-गंज) वगैरे उदाहरणे देऊन श्रीबाबा शेवटी म्हणाले,

"सारांश, अज्ञानाचा समूळ नाश झाल्यावर जे उरेल, ते शुद्ध ज्ञान असेल, हेच वर उद्धृत केलेल्या श्लोकाचे हृदगत आहे."

हे गोड निरूपण ऐकून नानासाहेब चांदोरकरांनी श्रीबाबांच्या चरणी लोटांगण घातले व दोन्ही हातांनी त्यांचे चरण वंदिले.

ही कथा श्रीसाईसच्चरित या साईबाबांच्या चरित्रग्रंथात अध्याय २९ मध्ये आलेली आहे. ज्या अभिनव पद्धतीने वरील श्लोकाचा श्रीबाबांनी अर्थ विशद केला, यावरून त्यांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व दिसून येते.

# श्रीसाई सहवासातील भक्त–कृ. जा. भीष्म

–श्री मोहन शामराव लोंबर
स्वारगेट पुणे ३७.
पुणे–सातारा रोड,

* महाराष्ट्र ही पवित्र पुण्यपावन संतभूमी आहे. समर्थ रामदास, संतश्रेष्ठ नामदेव, ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम महाराज ज्याप्रमाणे संत झाले तसेच गोदा तटी श्रीसाईनाथ संत झाले.

श्री साईच्या सान्निध्यात अनेक मोठ मोठी विद्वान भक्त मंडळी असत साई चरित्रकार अण्णासाहेब दाभोलकर, नानासाहेब चांदोरकर, तात्यासाहेब नूलकर, शा.मा., बुटी, काका तथा लक्ष्मण गणेश महाजनी आणि यांच्याच सान्निध्यात कृष्णराव जागेश्वर भीष्म हे भक्तश्रेष्ठ झाले.

कृष्णराव भीष्मांचा जन्म सन १८५४ साली झाला. त्यांचे बरेचसे वास्तव्य नागपूरला झाले. सर्व शिक्षण मराठी मध्ये झाले. त्यांनी शाळा खात्यात नोकरी केली. पुढे राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला व १९०१ च्या कायदभंग चळवळीत रेव्हीन्यू खात्यातली नोकरी सोडली व काही काळ शेती मध्ये घालविला नंतर १९१२ पासून श्री दादासाहेब खापर्डे यांच्या बरोबर श्रीसाईंच्या समवेत काळ घालवला. आणि त्याच सुमारास गोपाळराव गुंड, तात्या कोते, नानासाहेब निमोणकर, दामुअण्णा कासार, शामा यांनी प्रथम श्रीराम नवमी उत्सव शिरडीस चालू केला यावेळी श्री कृष्णराव भीष्म यांनी प्रथम बाबांच्या समोर कीर्तन केले तेव्हां पासून ते भजन कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध झाले.

पुढे वानप्रस्थाश्रमात मोहपा (जि. नागपूर) येथे वास्तव्य केले. तेथेच त्यांनी 'श्रीसाईनाथ सगुणोपासना', ब्रम्हर्षी विश्वामित्र, भक्तराज जटायू, रामाची अवतार गणना, परशुराम पराभव, रामायण ही कादंबरी की इतिहास, गुरुप्रसाद, सीता देवीचा अग्नी प्रवेश, समुद्र दर्शन, अहिल्योद्धार, सुवर्णमृग, रामेश्वर दर्शन इत्यादि लिखाण केले. डा. मुंजे, डॉ. प. पू. हेडगेवार, श्री दादासाहेब खापर्डे हे त्यांचे परम स्नेही होते.

असे हे श्रीसाईभक्त मोहपा येथे दिनांक ८–८–३५ रोजी समाधिस्थ झाले.

(पान १६ वरून)

मध्यंतरी आनंदीच लग्न झालं. तेव्हां रक्षाबंधनाला तिच्या आईवडिलां ऐवजी आता तिचे यजमान तिच्या सोबत शिरडीला येतात. मग ती सर्वजण त्या तरुणासोबत नागपूरला जातात. दिवाळीत तो तरुण आपल्या कुटुंबा समवेत मुंबईला आनंदीकडे येतो. येण-जाणं वाढल आहे. स्नेह वाढला आहे. अंतरीच्या जिव्हाळयानं घरोबाही वाढत गेला आहे. तो आज पर्यंत.

पंधरा वर्ष होऊन गेली या गोष्टीला एकोणीस वर्षांची नीता झालीय. भाऊ-बहिणीचे बंध जुळले ते कायमचे. समाधि मंदिरात प्रत्येक राखी पौर्णिमेला साईबाबांची पाषाणमूर्ती क्षणभर सचेतन होऊन, आजही त्यांचा रक्षा बंधनाचा हा सोहळा पहात असते.

"आत्या! आत्या! अग झालं की नाही?" नीताने स्वयंपाक घरात दुपार-च्या जेवणाची भांडी विसळीत असलेल्या आनंदीला विचारलं.

"झाल हं! आता थोड्याच वेळात निघू आपण," असं म्हणत आनंदीने नीताला साईबाबांच्या तसबीरी पुढे उभी करून नमस्कार केला व चिमुटभर विभूती कपाळाला लावून, त्या दोघी मुलाखतीच पत्र घेऊन बाहेर पडल्या. ※

# पळवाट

बाबा असले जरी एकटे
भक्तांची ती लाखो संकटे
दूर पळविती बसुनी ठिकाणी
ऐसी अद्‌भूत त्यांची करणी ॥१॥

श्रद्धा भक्ति जया अंतरी
जो करितो शिर्डीची वारी
उदी जयासी अमृत वाटे
त्या भक्तांसी ना कांहीं तोटे ॥२॥

बाबांची वसति ज्या सदनी
नामस्मरण "श्री" ज्यांचे वदनी
भाव भक्तिचा महिमा अफाट
दुष्ट ग्रहे शोधिती पळवाट ॥३॥

—श्री किशन कुलकर्णी
सिनियर असिस्टंट अॅग्रीकल्चर डिपार्टमेंट,
कॅंप, आदिलाबाद, ५०४ ००१ (आं. प्र.)

# श्रीसाई सुमन माला

| | |
|---|---|
| १) श्रद्धा धरा सबुरी जोडा | भक्ताला साई गणेश पावेल खरा |
| २) प्रेम करा भक्ती जोडा | साई माऊलीचा आनंद लुटा |
| ३) प्रपंच करा परमार्थ जोडा | साई दत्ताचे चिंतन करा |
| ४) कर्म करा कर्तव्य जोडा | तोचि साई श्रीकृष्णाचा कर्मयोगी खरा |
| ५) विवेक करा वैराग्य जोडा | साई शंकराची उदी लावा |
| ६) सत्य धरा सत्व जोडा | साक्षी श्रीसाईराम रक्षी तया |
| ७) यात्रा करा पुण्य जोडा | शिर्डी साई विठ्ठलाची वारी करा |
| ८) सदाचार करा सेवा जोडा | तोचि साई अल्लामालिकचा बंदा खरा |
| ९) ममता धरा समता जोडा | अणुरेणु भरला साई श्रीरंग पहा |
| १०) दया करा धर्म जोडा | मानवतेला साईनाथ धरा |
| ११) तत्त्व धरा अद्वैत जोडा | शाश्वत सौख्याचा साईदेव धरा |
| १२) दान करा त्याग जोडा | आत्मकल्याणाचा साईबोध धरा |
| १३) संतसंग करा चित्तशुद्धि जोडा | आत्मोद्धाराचा साईमार्ग धरा |
| १४) नित्यनेम करा उपासना जोडा | साई पूर्णब्रम्हाची कृपा धरा |
| १५) नाम धरा ध्यान जोडा | साई जिवाशिवाचे मिलन करा |
| १६) साई पोथी धरा अर्थ जोडा | साई आदेशाचा धडा गिरवा |

—सौ. शांता अंबाजी सरोदे.
उल्लेगल बि. नं. ६, खो. नं. १०,
एन्. सी. केळकर रोड, दादर, मुंबई २८.

★

# मशिदीत प्रगटले

(जाति – प्रणय प्रभा)

मशिदीत प्रगटले परमेश्वर
साईबाबाच म्हणती त्या नारी–नर ।।धृ.।।

नरदेही अवतार घेऊनि
अचाट केली अद्‌भूत करणी
स्नेह रज्जूनी सकलां बांधूनि
भेद भाव केला दूर । मशिदित प्रगटले ।।१।। धृ ।।

मंदिर मस्जिद एकच असती
राम रहिम त्यामध्ये वसती
भाव जसा तैसीच प्रचिती
समान प्रिती सर्वांवर । मशिदीत प्रगटले ।।२।। धृ ।।

अनंतरूपे एकचि देव
तिथे न कोणाला मज्जाव
शरणांगताला मिळेल ठाव
शिकवण ही वारंवार । मशिदीत प्रगटले ।।३।। धृ ।।

धुनी जागवून दिव्यत्वाची
उदी देऊनी चैतन्याची
ध्वजा रोविली अमरत्वाची
शिरडीस बनविले पंढरपूर । मशिदीत प्रगटले ।।३।। धृ ।।

अजून त्या तुर्वतीत घुमती
शब्द साईचे अवती भवती
'येईल मजला जो शरणांगति'
करीन रक्षण त्याचे त्रिवार । मशिदीत प्रगटले ।।५।। धृ ।।

–श्री. स. ना. नवरे
क्वा. नं. २०१२०, साऊथ टी. टी. नगर,
भोपाळ (म. प्र.)

# —: धावा :—

शिर्डीवाले साईबाबा धावूनिया याहो
चुकलो माकलो तरीहि आम्हां सांभाळून घ्याहो ॥धृ.॥

पायापाशी तुमच्या आम्ही आशिर्वाद मागू ।
जे जे घडेल ते ते बाबा तुम्हांलाच सांगू ।
तुम्हांवाचूनी आम्हांला तारणार कोण हो ॥१॥ धृ ॥

काय सांगू बाबा तुम्हां सारखी गाऱ्हाणी ।
हेवे दावे येथे भरले जग हे अडाणी :
हित आपुले ह्या जगता कसे कळेनाहो ॥२॥ धृ ॥

अशा हीन जगामध्ये कुणावरी विसंबू ।
शिळेवरच्या फकिरारे कसे तुला सांगू ।
तुम्हांविण जग हे साई कसे चालणार हो ॥३॥ धृ ॥

विनवणी पायापाशी शिर्डीवाले बाबा ।
हांके सरशी धावूनिया आलात कितीदा ।
याही वेळी साईबाबा तसेच धावाही ॥४॥ धृ ॥

—श्रीमती श्री शहाणे
लक्ष्मी निवास, गडकरी पथ,
डोंबिवली (पूर्व)

# साई वारस तो कोणाचा

पूर्ण मनोरथ साई करिती
म्हणूनि तयासी सज्जन भजती ॥धृ॥

अंतर्ज्ञानी साईनाथ ते
कोठे घडते काय कळे ते
गुणगाथा ती गाता थकते
वाणी आणिक मती

स्वामी साई श्री शिरडीचा
सुपुत्र तो गोदा मातेचा
प्रथरेला आशीष साईचा
तीर्थंकर तो म्हणूनी पुजिती .....

फकीर असूनी फिकिर जगाची
विरक्त वृत्ति पहा तयाची
तळमळ त्या विश्वक्षेमाची
नाथ अनाथांचा वदती .....

वारस का हा नवनाथांचा ?
बुद्ध, तुका का ज्ञानेशाचा?
किंवा समर्थ सज्जनगडचा?
आसमंति साईच्या ज्योति .....

—श्री. विनायक पाठक
बी १७।२३४ राजावाडी, घाटकोपर, मुंबई ७७.

# साईलीला

बाबा साईनाथ शिरडीचे संत,
लागलीसे खंत भेटीलागी ।।

ध्यानी मनी तुची आम्हां रात्रंदिन ,
नाही तुजविण दुजे कोणी ।।

संसारी रमले चित्त तुझे ठायी,
भक्ती तव पायी आमुची रे ।।

दिन उगवतां दर्शनाची आस,
सुखाची रे रास आम्हां देई ।।

दिन दुबळ्यांचा असशी आधार,
वृत्ति रे सुधार त्या पाप्यांची ।।

संकटाचे काळी येई तू धावूनी,
भक्ती ही पाहूनी कुटुंबाची ।।

—सौ. आशालता का. भालेराव
दत्त मंदिर वाड्यात
मु. पो. ता. नवापूर, जि. धुळे,

# देई दर्शन साई देवा

तळमळ लागे आता जीवा
देई दर्शन साई देवा ॥धृ.॥

बहुत हिंडलो मी भवताली
नाना रूपे तुझी पाहिली
परी अंतरी तुझाच ठेवा ॥१॥

नाम ऐकूनी आलो दारी
जाऊ कसा मी मग माघारी?
तव चरणी मज आश्रय द्यावा ॥२॥

सगे सोयरे सर्व सोबती
नाम तुझे मम राहो चित्ती
मीपणाचा विसर पडावा ॥३॥

व्यापून राहे तुझा नीलिमा
तव नामाचा अपूर्व महिमा
अमृत सिंचन करि रे देवा ॥४॥

—श्री. राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'
पाटकर वाडा, भगतसिंग रोड,
डोंबिवली (पूर्व), जि. ठाणे ४२१ २०१.

# श्रीसाई पादुकाष्टक

श्री साईदत्त शिरडीत अवतरला
तेथेच साईदत्त समाधिस्त झाला
ज्यांनी शिरडी गाव पुनीत केला
नमस्कार माझा साईपादुकाला ॥१॥

रवि ते जे सामर्थ्य लाभे ज्याला
अशा विभूतीला जन वंदिती पदाला
परब्रम्ह चैतन्य तो म्हणती ज्याला
नमस्कार माझा साई पादुकाला ॥२॥

तेजस्वी अंगकांती लाभली ज्याला
जो संपूर्णपणे वैराग्य संपन्न झाला
सर्वभूती समदृष्टि दिसे ज्याला
नमस्कार माझा साई पादुकाला ॥३॥

जन म्हणती आजानुबाहु ज्याला
ज्यांनी गरीब दुबळा जनाला
अनुग्रह करोनी त्यांचा उद्धार केला
नमस्कार माझा साई पादुकाला ॥४॥

देह अहंभाव ज्याचा सर्व निमाला
ज्यांनी अगणित लीला केल्या
धुनी पेटवूनी उदीचा प्रसाद दिला
नमस्कार माझा साई पादुकाला ॥५॥

ज्यांनी ज्ञानामृत पाजिले भक्ताला
मुमुक्षू मोक्षपथ दाखविला
नसे काम क्रोध मत्सर मोह ज्याला
नमस्कार माझा साई पादुकाला ॥६॥

दीव्यत्वाची प्रचिती आली जनाला
त्यावेळी भक्तगण धावले दर्शनाला
श्रद्धा सबूरीचा मंत्र ज्याने दिला
नमस्कार माझा साई पादुकाला ॥७॥

देऊनि प्रसाद उदीचा भक्ताला
रोगमुक्त केले असंख्य जनाला
अशा विभूतीचा भारता लाभ झाला
नमस्कार माझा साई पादुकाला ॥८॥

–श्री. रमाकांत पंडित
प्रभास्मृती, भाऊदाजी रोड, माटुंगा, मुंबई १९.

—०००००००—

# जन्मोजन्मी झिजावी तवपदी काया

(चाल हरीपाठाची)

भक्तावीण नाही नाही छंद दुजा!
पतितपावन तूची खरा ॥
भटटीमध्ये खुपसूनी दोन्ही तव कर,
वाचविसी पोरा साईनाथा ॥१॥
टाकूनीया वेशीवरी पिठ वेगी
महामारीलागी पळविले
सर्पदंश होता 'शामा'लागी जेव्हां
जबरे त्यास दरडाविले ॥२॥
विषमज्वराने बाळ तो बेजार
लावूनिया उदी वाचविला ॥
कितीक संसारी त्रस्त पायी आले
उद्धरीले त्यांना क्षणोक्षणी ॥३॥
असता शिरी तुझा हस्त देवा
भिती नच मज कळीकाळाची
तूच माझा राम तूच कृष्णराया
तव पदी आसरा देई आता ॥३॥
संसार सागरी डुबतसे नौका
पैलतीरा त्यास आता नेई
जन्मोजन्मी झिजो तवपदी काया
आस पुरवावी शिर्डीराजा साई ॥५॥

–श्री. श्रीधर सिद्धेश्वर प्रभूणे
१७८, यादोगोपाळ पेठ, सातारा

श्रीसाई कृपा फोन १९

श्रीसाई भक्तांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असलेले

# मे. गंगवाल ए. एस. आणि कंपनी

श्रीसाईप्रसादाचे होलसेल व रिटेल व्यापारी

आमचेकडे श्री साईच्या पूजेचे साहित्य, श्रींच्या समाधीसाठी व मूर्तीसाठी लागणारे वस्त्र, मस्तकासाठी सिल्क रुमाल, राजूरचे स्पेशल कंदी पेढे, ऊद (लोभान), अष्टगंध, कुंकु खात्रीशीर व योग्य भावात मिळेल.

ठिकाण — फुल मार्केट चौक — शिरडी

फोन १९

# सचिन जनरल स्टोअर्स

प्रो. किशोर शांतीलालजी गंगवाल

आमचेकडे सर्व प्रकारची स्टेशनरी, होजीअरी आयटेम तसेच श्रीसाईच्या भजनाच्या व फिल्मी गाण्याच्या उत्कृष्ट रेकॉर्डेड कॅसेट खात्रीशीर व योग्य भावात मिळतील.

ठिकाण — फुल मार्केट चौक, — शिरडी

# श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

## पोलिओ व अस्थिव्यंग उपचार शिबीर, १९८३

श्री साईबाबा संस्थान, शिरडी तर्फे दि. २७–५–१९८३ ते २८–५–१९८३ अखेर श्रीसाईनाथ रुग्णालय शिरडी येथे पोलिओग्रस्त व अपंग उपचार शिबीर आयोजित केले होते.

सदर शिबीरात भाग घेणाऱ्या रुग्णांना शेवटची नोंदणीची ता. २५–५–८३ पर्यंत होती. शिबीराची जाहिरात दै. सार्वमत, दै. गावकरी, दै. लोकमत, औरंगाबाद, दै. गावकरी (नाशिक) ह्या वृत्तपत्रातून प्रसिद्ध करण्यात आली होती. सदरहू जाहिरातीमुळे आसपासचे बऱ्याच तालुक्यातील गरजू रुग्णांनी शिबीरात नाव नोंदवून भाग घेतला.

शिबीरात एकूण ३५० रुग्णांची नोंद होऊन प्रथम प्राथमिक तपासणी करण्यात आली, व त्यापैकी ८५ रुग्ण फक्त उपचाराकरिता दाखल केले. एकूण ४० रुग्णांवर दि. २८–५–८३ रोजी शस्त्रक्रिया करण्यात आली. ५७ रुग्णांना (कुबड्या) कॅलिपर्स तसेच आठ रुग्णांना कृत्रिम पाय मोफत दिले. रुग्ण व त्यांचे एकेक नातेवाईक यांची निवास, चहा, भोजन व्यवस्था संस्थान तर्फे विनामूल्य करण्यात आली होती.

शिबीराचा समारोप समारंभ दि. २८–५–८३ रोजी सायंकाळी ६–३० वाजता आयोजित केला होता. समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री. आर. आर. जहागीरदारसाहेब, प्रमुख न्यायाधिश, मुंबई सिटी सिव्हिल कोर्ट, मुंबई हे हजर होते. शिबीरात जागतिक कीर्तीचे अस्थिरोग तज्ञ डॉ. विक्रम मारवाह, नागपूर. डॉ. रजनीकांत आरोळे (मॅगसेसे पारितोषिक विजेते) मानद अस्थिरोग तज्ञ डॉ. व्ही. एम. याडकीकर, रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पी. एस. देशपांडे डॉ. एम. वाय. देशमुख, डॉ. वैद्य, डॉ. कुमारी लोंढे, तसेच श्रीरामपूरचे डॉ. सुभाष आगाशे, अहमदनगरचे डॉ. पांडे, डॉ. करमरकर, डॉ. किशोर सन्याल, डॉ. राव, नागपूर, डॉ. गुंजाळ, प्राथमिक आरोग्य केंद्र, राहाता, डॉ. दोडीवाला, डॉ. गायकवाड, राहाता, यांनीही शिबीरात बहुमोल सहाय्य केले. शिबीरात प्राथमिक आरोग्य केंद्रातील परिचारिका व इतर स्टाफनी भरपूर सहाय्य केले.

दि. १–६–८३ रोजी सर्व रुग्णांना घरी पाठविण्यात आले. बाकीच्या रुग्णांना तारखेनुसार वेळ देऊन त्यांचेवर शस्त्रक्रिया करणेसाठी बोलाविण्यात आले. ह्या शस्त्रक्रिया श्री साईनाथ रुग्णालयात पुढे झाल्या.

शिबीर यशस्वीरित्या पार पडणेचेकामी जिल्हा आरोग्याधिकारी, अहमदनगर, सिव्हिल सर्जन, सभापती, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगाव, तहसीलदारसाहेब, कोपरगाव यांचे सहकार्य मिळाले. संस्थानचे मुख्य लेखाधिकारी मुंबई, श्री. वि. श्री. आपटे, व कु. रेखा दिघे वरिष्ठ लेखापाल हेही उपस्थित होते.

समारोपाच्या भाषणात कोर्ट रिसीव्हर श्री. क. हि. काकरे यांनी उपस्थित सर्जन व संस्थान सेवक यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल गौरवपूर्ण उल्लेख करून धन्यवाद दिले.

श्री. डी. सी. पाठक, शासकीय अधिक्षक यांनी आभार प्रदर्शन केले. ※

# शिरडी वृत्त माहे जून १९८३

जून महिन्यामध्ये बाहेरगावहून येणाऱ्या साईभक्तांची गर्दी पहिल्या पंधरवड्यात जास्त प्रमाणात होती. त्यानंतर गर्दीचे प्रमाण थोडे कमी झाले. काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे –

**कीर्तन** – १) ह. भ. प. विश्राम बाबाजी ठुबे, निमगाव

**प्रवचन** – १) ह. भ. प. मुरलीधर महाराज देशमुख, शिर्डी.
२) ह. भ. प. जगन्नाथबुवा वाकचौरे, शिर्डी.

**भजन, गायन, वादन वगैरे** – १) श्री साईनाथ भजनी मंडळ, शिर्डी, २) श्री. गंगाधर विश्वनाथ संत, बडोदा, ३) श्री. रमाकांत गंगाधर संत, बडोदा, ४) श्री. संजय रमाकांत संत, ५) सौ. ज्योती ए. मनुजा, ६) श्री. आंशीराम एम. मनुजा, ७) कु. मीना ए. मनुजा, ८) मास्टर चाँद ए. मनुजा ९) मास्टर मेहेर ए. मनुजा, मुंबई, १०) दंडपाणी, मद्रास, ११) श्री. रतनलाल शर्मा, नागपूर, १२) श्री. एस्. के सक्सेना, दिल्ली, १३) सौ. अलका भालचंद्र रिसवडकर, अंधेरी १४) सौ. सुनीता गणेश केळकर, सांगली, १५) श्री साईनाथ भजनी मंडळ, शिर्डी, १६) श्री. नंदकिशोर पुरोहित मुंबई, १७) श्री. ज्ञानेश्वर आमजा प्रधान, रायगाव, १८) श्री. भगवान आम्हजा प्रधान रायगाव.

**हवापाणी** :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पाऊस पडणेस अजून सुरवात झालेली नाही.

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२=०० | ६=०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३=५० | ४=०० |
| ३) | ,, | हिंदी | १२=०० | ४=०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२=०० | ४=०० |
| ५) | ,, | कन्नड | १०=०० | ४=०० |
| ६) | ,, | तेलगू | १३=०० | ४=०० |
| ७) | ,, | तामीळ | १२=०० | ४=६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७=५० | ३=०० |
| ९) | ,, | हिंदी | ७=०० | ३=५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४=२५ | ३=०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४=०० | ३=०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०=३५ | ३=०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०=३० | ३=०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०=५० | ३=०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०=५० | ३=०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १=२५ | ३=०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५=०० | ३=०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०=७५ | ३=०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४=०० | ३=०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४=५० | ३=०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १=७५ | ३=०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १=७५ | ३=०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २६) | ,, | हिंदी | १=७५ | ३=०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

( कव्हर पृष्ठ ३ वरून )

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०=५० | ३=०० |
| १८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५=२५ | ३=०० |
| १९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १=५० | ३=०० |
| २०) | ,, | मराठी | १=५० | ३=०० |
| २१) | शिरडी गाईड | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २२) | ,, | हिंदी | छपाई चालू | आहे. |
| २३) | रुद्राध्याय | मराठी | ०=९० | ३=०० |

२४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी १०=०० प्रत्येकी प्रत १=००
( व्ही. पी. ची पद्धत नाही )

| अ. क्र. | फोटोचे नाव | फोटो साइज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १=६५ | ३=०० |
| २) | ,, | १०"×१४ | १=१० | ३=०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०=५५ | ३=०० |
| ४) | ,, | ४"×५" | ०=२० | ३=०० |
| ५) | ,, | २"×३" | ०=१५ | ३=०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा ( रंगीत ) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ७) | ,, ( काळा पांढरा) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २=७५ | ३=०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १=०० | ३=०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा ( रंगीत फोटो ) | १०"×२० | १=१० | ३=०० |
| ११) | ,, ( काळा पांढरा) | १०'×१४" | ०=८५ | ३=०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो ,, | ९'×१२' | १=१० | ३=०० |
| १३) | ,, ( रंगीत ) | ९"×१२' | १=६५ | ३=०० |
| १४) | निळा | ९×१३ | ०=७५ | ३=०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पत्र्याचे कॅलेंडर | — — — | १६=०० | ८=०० |

मुद्रक : पांडुरंग मोरे यांनी नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि., ४२, बी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. क. द्वि. काकरे, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लाट नं. ८०४ बी. दादर, मुंबई १४